# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०२ मार्च, २०२० / फाल्गुन १२, १९४१ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | गृह मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | महसूल मंत्री | |
| (३) | पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री | |
| (४) | कृषि, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री | |
| (५) | रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री | |
| (६) | वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६४**

---

### परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने भेसळयुक्त बियाण्यांचा पुरवठा केल्याबाबत

**(१) * १९६ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने महाबीज मंडळ व शेतकरी यांना सोयाबीन-७१ या भेसळयुक्त ब्रिडर बियाण्यांचा पुरवठा केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषि विद्यापीठाचे कुलगुरु व अधिकाऱ्यांनी उक्त प्रकरणी कबुली देवुन यापुढे असे होणार नसल्याचे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व विद्यापीठामधील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी पीक काढणी करण्यासाठी कंबाईन हार्वेस्टरचा वापर केलेला होता, अनावधानाने त्यात अगोदर शिल्लक असलेल्या दुसऱ्या सोयाबीन वाणाचे बियाणे मिसळले गेले असल्याने भेसळ आढळुन आलेली आहे. यापुढे भविष्यात सोयाबीन काढणीसाठी  कंबाईन हार्वेस्टरचा वापर न करण्याबाबत कृषि विद्यापीठाकडून सर्व बीजोत्पादन क्षेत्रावर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विक्रोळी ते मुलुंड या भागातील मिठागराच्या जागेबाबत

**(२) * ६४० श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.बालाजी किणीकर**

**(अंबरनाथ), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राणे (बोरीवली), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा)** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी ते मुलुंड या भागातील एकूण मिठागराच्या जागेपैंकी ३०० एकर जागा विकासकांना वापरता येऊ शकते याबाबतचा अहवाल एमएमआरडीएने शासनास सादर केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या केंद्र शासनाच्या योजनेला गती देण्यात येऊन वाजवी दरातील घरे या जागेवर बांधण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जमिनीवर केंद्र शासनाने हक्क सांगितल्यामुळे वाजवी दरातील घर बांधण्याचा प्रकल्प सुरु करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मिठागरांच्या जमिनी ह्या भरती-ओहटी क्षेत्रामध्ये येतात, त्यामुळे भरतीचे पाणी साठविले जात असल्याने भराव टाकून या जमिनीवर इमारती उभ्या केल्या तर भरतीचे पाणी जाण्यास मार्ग नसल्याने या जमिनीवरील घरांना धोका निर्माण होऊ शकतो असा इशारा पर्यावरण अभ्यासकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या मिठागरांवर मिठशेती करणाऱ्यांचे पुनर्वसन करुन त्यांनाही या योजनेचा लाभ शासन देणार आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मिठागर जमिनींचा समुचित वापर करण्याच्या दृष्टीने बृहत आराखडा तयार करण्याकरीता शासन निर्णय, दिनांक २१/०८/२०१५

अन्वये शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास" नियुक्त केले आहे. सदर प्रक्रियेवर पर्यवेक्षण व संनियंत्रण ठेवण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "उच्चधिकार समिती" गठीत करण्यात आली आहे.

पर्यावरण विभागाकडील अद्ययावत नकाशे, पाणथळ जागेची व्याख्या, आणि पर्यावरण विभागाकडून प्राप्त झालेल्या सन २०११ च्या CRZ अधिसूचनेनुसार CZMP यांची माहिती संकलित केली असता, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील ७ मिठागरांच्या क्षेत्रात झोपडपट्टीचे क्षेत्र धरुन एकत्रितपणे सुमारे ३५५.३३ एकर इतके विकसनशील क्षेत्र उपलब्ध होत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. उक्त विकासनशील क्षेत्रात CRZ-I क्षेत्राचा समावेश नाही. या मिठागर जमिनी केंद्र व राज्य शासन यांच्या मालकीच्या असल्याने, सदर जमिनींच्या विकासासंदर्भात दोन्ही शासनांच्या समन्वयाने धोरण ठरवावयाचे आहे. त्यासाठी जागेवर प्रत्यक्ष मोजणी करुन व बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विकास आराखडा-२०३४ प्रमाणे विकसनशील आरक्षणे यांचा विचार करुन, विकासाचे धोरण ठरविणे अभिप्रेत आहे. त्याशिवाय, उक्त विकसनशील क्षेत्राच्या निश्चित वापराविषयी निर्णय घेता येणार नाही. त्यामुळे सदर जमिनीवर वाजवी दरातील घरबांधणी प्रकल्प राबविण्यासंबंधी राज्य शासनाने अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही.

वरील प्रमाणे विकासासाठी उपलब्ध होणारी जमीन ही मीठ उत्पादनाखाली येत नाही, याची तपासणी मिठागर आयुक्त यांच्याकडून करुन घेण्याचे संकल्पित आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोसा (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथे दिलीप बिल्डकॉन कंपनी गौण खनिजाचे नियमबाहय उत्खनन करत असल्याबाबत

**(३) * ५३१८ श्री.नामदेव ससाने (उमरखेड), श्री.बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसा (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथे नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम करत असलेली दिलीप बिल्डकॉन कंपनी गौण खनिजाचे नियमबाहय उत्खनन करत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे डिस्कळ (ता.खटाव, जि.सातारा) येथील गटांच्या नोंदी भूमी अभिलेखात करण्याबाबत

**(४) * ४१८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डिस्कळ (ता.खटाव, जि.सातारा) येथील गट क्र.१३५५ च्या पुढील सर्व गटांच्या नोंदी भूमी अभिलेखात नसल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उप अधिक्षक भूमी अभिलेख, खटाव, मु.वडूज व उपसंचालक, भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात सदर गटांच्या नोंदी घेण्याबाबत आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांनी वारंवार मागणी करूनही संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे मोठा कालावधी होवून सुध्दा नोंदणी न झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून येथील गटांच्या नोंदी तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे डिस्कळ ता. खटाव जि. सातारा या गावी दिनांक १६.०३.१९७२ रोजी जमीन एकत्रीकरण योजना मंजूर करण्यात येवून, मंजूर जमीन एकत्रीकरण योजनेचा अंमल घेणेत आला. त्यावेळी मौजे डिस्कळ गावास एकूण १ ते ३४२५ गट नंबर देणेत आले होते. दि. १५.५.१९७६ रोजी मौजे डिस्कळ गावाचे वाडी विभाजन होऊन मौजे गारवाडी, मौजे अनपटवाडी व मौजे चिंचणी ही नविन गावे मौजे डिस्कळ या मुळ गावातून वेगळी महसूली गावे तयार करण्यात आली. त्यानंतर दि.१४.१०.१९८५ रोजी मौजे डिस्कळ या गावातून मौजे काळेवाडी व मौजे पांढरवाडी ही दोन नविन महसूल गावे वेगळी करण्यात आली. त्यामुळे सदर वाडी विभाजनानंतर मुळ डिस्कळ या गावामध्ये आज रोजी आकारबंदानुसार १३५५ पर्यंत गट नंबर अस्तित्वात आहेत. तथापि, गट नंबर १३५५ चे पुढील गट नंबरांचा वाडी विभाजना पूर्वीचे गट नकाशात व आकारबंदास अंमल घेतला गेला नसलेमुळे सदरचे गट वाडी विभाजनाच्या आकारबंदामध्ये घेणेत आलेले नाहीत.

या संदर्भात श्री. कुंडलिक विठ्ठल काटकर या व्यक्तिचा अर्ज उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांना प्राप्त झाला आहे. याबाबत कार्यवाही पूर्ण करून अहवाल सादर करणेबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सातारा यांना उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांनी पत्रान्वये सूचना दिल्या आहेत.

-----------------

## मुंबई, ठाणे व नवी मुंबईतील कामगार मंडळ व्यवस्थापनाने माथाडी कामगारांच्या निधीचा केलेला अपहार

**(५) * ९५०   श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे व नवी मुंबईतील माथाडी कामगार आणि सुरक्षा रक्षकांच्या कल्याणाची जबाबदारी असलेल्या तीन हजार कामगार मंडळाच्या व्यवस्थापनाने केलेल्या १०० कोटी रुपये रकमेच्या अपहार प्रकरणी पोलिसात गुन्हे दाखल करण्यात येऊनही अद्याप शासनाने दोषींविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांच्या 'रेल्वे गुड्स क्लिअरिंग अँड फॉरवर्डींग इस्टॅब्लिशमेंट मंडळ', 'लोखंड व पोलाद कामगार मंडळ' आणि 'धातू व कागद बाजार मंडळ' या तीन मंडळाचे प्रतिनिधी यांनी बँकेतील अधिकाऱ्यांबरोबर संगनमत करुन माथाडी कामगारांच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपहार केल्याप्रकरणी दोन वर्षापूर्वी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात येऊनही अद्याप याविरुद्ध पोलिसांनी कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू माथाडी कामागारांना न्याय देण्यासाठी सदर प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) प्रस्तुत प्रकरणी ९० कोटी ७२ लाख ४५ हजारच्या अपहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तथापि, या रकमेच्या अपहार प्रकरणी पोलीसात गुन्हे दाखल करण्यात येऊनही शासनाने दोषींविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही, हे खरे नाही.

(२) व (३)

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व भा.दं.वि. कलम |
|---|---|---|
| १ | दादर ठाणे | ५९/१६, कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४७२, ३४ भादंवि |
| २ | आंबोली (तपास आगुवि मुंबई) | ९७/१६, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), ४११, ४१४, भादंवि |

| | | |
|---|---|---|
| ३ | आंबोली (तपास आगुवि मुंबई) | १००/१६, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), ४११, ४१४, भादंवि |
| ४ | भायखळा (तपास आगुवि मुंबई) | ३९/१९, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), भादंवि |
| ५ | साकीनाका मुंबई | ९४५/१९, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, १२०(ब), ३४ भादंवि |
| ६ | खांदेश्वर (नवी मुंबई) | ७७/१६, कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), भादंवि |
| ७ | खडकपाडा ठाणे शहर | २४१/१६, कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ४२०, १२०(ब), ३४ भादंवि |

उपरोक्त गुन्ह्यात ३६ ज्ञात व इतर आरोपी निष्पन्न झाले असून २२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यांमध्ये एकूण रक्कम रु.९० कोटी ७२ लाख ४५ हजारचा अपहार झाला असून त्यापैकी रक्कम रु.१७ कोटी ८९ लाख ४ हजार २४४ हस्तगत करण्यात आली आहे.

नमूद गुन्ह्यापैकी ६ गुन्हे न्यायप्रविष्ठ असून १ गुन्हा तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध तुरुंगातील कैदी संसर्गजन्य आजारांनी ग्रस्त असल्याबाबत

**(६) * ३६९९ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मध्यवर्ती आणि जिल्हा कारागृहातील कैद्यांना झोपण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने एकमेकांच्या संपर्कामुळे २ हजार १९३ कैद्यांना त्वचारोगाने ग्रासले असल्याचे नियंत्रक व महालेखापाल (कॅग) यांच्या माहे मार्च, २०१८ मधील अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील येरवडा मध्यवर्ती कारागृहात आणि सुधारगृहात प्रत्येक कैद्याला झोपण्यासाठी पुरेशी जागा नसून बराकींची अधिकृत क्षमता १२० असतांना प्रत्यक्षात ३८३ कैदी दाखल असल्याने कारागृहात प्रत्येक कैद्याला विश्रांतीसाठी फक्त १.१७ ते १.१९ चौ.मी. जागा उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून कैद्यांना होत असलेल्या त्वचारोगासह इतर संसर्गजन्य आजारांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

येरवडा मध्यवर्ती कारागृहाची बंदी क्षमता २४४९ असून सद्य:स्थितीत सरासरी ५८०० एवढे बंदी कारागृहात दाखल आहेत. कारागृहामध्ये नव्याने आठ नवीन बॅरेक्सचे बांधकाम प्रस्तावित असून, त्यामधील दोन बॅरेक्सचे बांधकाम पूर्ण झाले असून तीन बॅरेक्सचे तळमजल्याचे आरसीसी काम पूर्ण झाले असून, पुढील बॅरेक्सचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) येरवडा मध्यवर्ती कारागृहात बंद्यांकरीता रुग्णालय असून चार वैद्यकिय अधिकारी, एक मनोविकृत चिकित्सक, तीन मिश्रक, एक प्रयोगशाळा तंत्रज्ञ व सहा परिचारक कार्यरत आहेत.

कारागृहामध्ये त्वचारोगासह इतर संसर्गजन्य आजाराच्या बंद्यांना, स्वतंत्र बॅरेक्समध्ये ठेवण्यात येते. आठवडयातून एक वेळ त्वचारोग तज्ञ, वैद्यकिय अधिकारी कारागृहास भेट देतात. याशिवाय वैद्यकिय शिबिरांचे आयोजन करुन बंद्यांची नियमितपणे तपासणी करुन आवश्यक तो उपचार केला जातो

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबत

**(७) * ३४५५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्याची वाढती लोकसंख्या व वाढत्या गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालय सुरु करण्याची मागणी गेली २५ वर्ष शासनाकडे वारंवार केली असून याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक यांचेकडे सादर करूनही याबाबत शासन स्तरावरून कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस आयुक्तालयासाठी पाठविलेल्या प्रस्तावात कसबा बावडा येथील गोळीबार मैदानावरील २८ एकर जागा राखीव ठेवण्यात आली असून उर्वरित २ एकर जागा फॉरेन्सिक लॅबसाठी आरक्षित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतच्या पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त कार्यालय नव्याने निर्माण करणेबाबतचे धोरण निश्चित झाल्यानंतर प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविले आहे.

प्रस्तावित कोल्हापूर पोलीस आयुक्तालयाची इमारत पोलीस विभागाच्या मालकीच्या सर्व्हे क्र.९५३/१अ येथील १.८७ हेक्टर जागेत प्रस्तावित आहे. तसेच पोलीस आयुक्तालयासाठी जुना गोळीबार मैदान या पोलीस विभागाच्या जागेवर (सर्व्हे क्र.२८अ क्षेत्रफळ ९.७१ हेक्टर) मध्ये नवीन मुख्यालयाची इमारत बांधणे (राखीव पोलीस निरीक्षक कार्यालय, भांडारगृह, मॅगजीन शस्त्रागार, बॅरेक, मोटार परिवहन विभाग, कवायत मैदान इ.) प्रस्तावित आहे.

कसबा बावडा येथील गोळीबार मैदानावरील २ एकर जागा फॉरेन्सिक लॅबसाठी आरक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त नाही. तथापि दि.०६.१०.२०१७ पर्यंत अद्यावत ७/१२ नोंदीनुसार ०.८० आर इतकी जागा न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकरिता राखीव असल्याची नोंद आहे.

-----------------

## मौजे कुकसे, बोरीवली, जांभूळपाडा व भोईरगाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे वन जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(८) * ४३० श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुकसे, बोरीवली, जांभूळपाडा व भोईरगाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे वन जमिनीवर अतिक्रमण करून मे. साई सदगुरु रियालिटी कंपनी कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवून शासकीय जमिनीवर अनधिकृत वेअर हाऊसचे बांधकाम करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, ठाणे व तहसीलदार, भिवंडी यांना निवेदन देऊन या प्रकरणी कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे व तहसीलदार भिवंडी यांनी कोणती कारवाई केली आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) मे.साई सद्गुरु रियालिटी कंपनी तर्फे भागीदार श्री.पद्माकर पांडुरंग भोईर व इतर यांनी मौजे कुकसे, बोरीवली, उसरोली व भोईरगांव, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील जमिनींच्या संदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून सन २००८ ते सन २०१७ दरम्यान वेगवेगळ्या आदेशान्वये बिनशेती परवानग्या

घेऊन गोडाऊनचे बांधकाम केलेले असून त्यांनी शासकीय व वन जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना (जि.जालना) तालुक्यातील शेतकऱ्यांना 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत अनुदान देण्याबाबत

**(९) * ३९५४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना (जि.जालना) तालुक्यातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या 'मागेल त्याला शेततळे' या योजनेंतर्गत या वर्षात सुमारे १९७ शेततळ्यांचे अनुदान मिळाले नसल्याचे दिनांक २३ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रलंबित अनुदान मागणीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून अद्यापपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जालना तालुक्यातील सदरहू योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेततळयांचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) जालना तालुक्यात पूर्ण झालेल्या शेततळ्यांसाठी रु.७.१८ कोटी अनुदान अदा केले असून, उर्वरीत पूर्ण झालेल्या शेततळ्यांसाठी अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोर, वेल्हे व दौंड (जि.पुणे) या तालुक्यांतील क्रिडा संकुलाबाबत

**(१०) * ५९९६ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर व वेल्हे (जि.पुणे) या तालुक्यांमध्ये क्रिडा संकुलासाठी शासकीय जमीन उपलब्ध होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री, जि.पुणे यांना दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, दौंड (जि.पुणे) तालुक्यात क्रीडा संकुलाला जागा मिळत नसल्यामुळे मागील अनेक दिवसांपासून तालुका क्रीडा संकुलाचे काम होऊ शकले नाही, परंतु, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास क्रीडा संकुलास सुमारे ८ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असुनही निधी उपलब्ध नसल्यामुळे अद्याप क्रीडा संकुलाचे काम सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भोर व वेल्हे या तालुक्यांतील क्रिडा संकुल उभारण्यासाठी तातडीने जागा उपलब्ध करुन देण्यासह दौंड तालुक्यातील क्रीडा संकुलास निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) भोर तालुका क्रीडा संकुलासाठी जागेची मोजणी करुन नकाशा तयार करण्यात आला असून, त्याप्रमाणे जागा मिळण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत विभागीय आयुक्त (महसूल शाखा), पुणे यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

वेल्हे तालुका क्रीडा संकुलाकरीता जागेची मोजणी करण्यात आली असून, नकाशा तयार करण्यात आला आहे. तहसिलदार, वेल्हे यांच्याकडे जागा प्राप्त करुन घेण्यासाठी प्रस्ताव सादर झाला आहे. जागा प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

तालुका क्रीडा संकूल, दौंडकरीता, मौजे दौड येथील सर्व्हे नं. १६६ मधील ३.२० हे.आर. इतकी जागा प्राप्त झाली आहे. प्रशासकीय मान्यतेनंतर निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तारापूर खाडीतील कांद्ळवनाची कत्तल करुन अनधिकृत बांधकामे करण्यात येत असल्याबाबत

**(११) * ४८७७ ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर खाडीतील कांद्ळवनाची कत्तल करुन अनधिकृत बांधकामे करण्यात येत असून तारापूर-चिंचणी मुख्य सागरी महामार्गालगत खाडीभागात भराव टाकून बांधकामे करण्यात वाढ होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, या खाडी भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरु असतानाही दोन वर्षापासून एकाही भूमाफियाविरोधात प्रशासनाने कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कांदळवनाची कत्तल करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मौजे तारापुर येथील पर्डी नं.५ मधील ०.२४.० हे.आर जागेत रमन तारापुरवाला व इतर तसेच मे.सुविधा डेव्हलपर्स (जितेंद्र मोहनलाल जैन) यांनी अनधिकृत बांधकाम केले आहे. सदर बांधकामाच्या १० मी अंतरावर कांदळवन वनस्पतीची हानी झाल्यामुळे पर्यावरण संरक्षण अधिनियम,१९८६ च्या कलम १५ (१),(२) नुसार तारापुर पोलिस स्टेशन येथे क्र.१ ०९/२०२० दि.११/०२/२०२० रोजी गुन्हा दाखल केला आहे.

मौजे चिंचणी येथील सर्वे नं.२३८८ मधील ०५३.२० हे.आर जमीन अश्वीन रतिलाल पारेख व इतर यांच्या नावे आहे. जमीनीच्या रस्त्याला लागुन असलेल्या खाजण जमिनी मध्ये पारेख यानी भराव केल्यामुळे कांदळवनाच्या झाडाला बाधा पोहचल्याने पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६च्या कलम १५ (१),(२) नुसार वाणगांव पोलिस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्र.२७/२०१८ दि.०१/०६/२०१८ रोजी दाखल केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दर्यापूर व चांदूर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे झालेले नुकसान

**(१२) * ३८३२ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यात लागवड केलेल्या मूग पिकांचे पावसाच्या विलंबाने, शेतातील सोयाबीन पिकांचे जास्त पावसाने व कपाशीवर बोंड अळीच्या प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांदूर रेल्वे तालुक्यातील तूर या पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांच्या तूर पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शेतपिकांचे तातडीने पंचानामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत:खरे आहे

दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यात उशिरा झालेला पाऊस व पावसातील खंड यामुळे मुग पिकाची उत्पादकता कमी झालेली आहे. सोयाबीन पिकाचे अतिवृष्टीमुळे जुलै ते ऑगस्ट, २०१९ मध्ये २०.४५ हे. व ऑक्टोबर ते नोव्हेंबर, २०१९ मध्ये ८८०२.०० हे. क्षेत्र बाधित झालेले आहे. कापूस पिकावरती बोंडअळी नियंत्रणासाठी मोहिम स्वरुपात उपाययोजना केल्याने प्रादुर्भाव नियंत्रणात आल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले नाही.
(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्य अंतर्गत इमॅमेक्टीन बेंझोएट जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यात २१० किलो ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. शेतकऱ्यांनी किड व्यवस्थापनामुळे कापूस व तूर पिकाचे होणारे नुकसान आर्थिक नुकसान पातळीच्या खाली राहिले.
(३) अमरावती जिल्ह्यात अवेळी झालेल्या पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूर, ज्वारी, मका, धान व इतर पिकांच्या नुकसानीच्या अहवालानुसार शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१९/प्र.क्र.१९१/म-३, दि.१८/११/२०१९ अन्वये शेतीपिके/फळपिकाचे नुकसानीसाठी २ हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी रु.८०००/- प्रमाणे महसूल यंत्रणेमार्फत शेतकऱ्यांना सदर नुकसान भरपाईच्या रक्कमेचे वाटप सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातून एकाच आठवड्यात आठ नागरिक बेपत्ता झाल्याबाबत

**(१३) * १५०६ श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातून प्रत्येक दिवशी एक नागरिक बेपत्ता होत असून रामदासपेठ पोलीस ठाण्यात एकाच आठवड्यात ८ नागरिक बेपत्ता झाल्याच्या तक्रारी दाखल झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आठ नागरिकांमध्ये चार युवतींचा समावेश असून एका वयोवृद्धासह तीन तरुणांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर बेपत्ता ८ नागरिकांपैकी किती नागरिकांचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१), (२), (३) व (४) अकोला शहरातील ८ पोलीस स्टेशन अंतर्गत माहे जानेवारी २०२० मध्ये १३ पुरुष बेपत्ता आहेत व त्यापैकी ५ पुरुष मिळून आलेले आहेत. तसेच ९ महिला बेपत्ता आहेत त्यापैकी ५ महिला मिळून आलेल्या आहेत. तसेच पोलीस स्टेशन रामदासपेठ अंतर्गत माहे जानेवारी २०२० मध्ये १ पुरुष व १ महिला याप्रमाणे दोन इसम बेपत्ता आहेत त्यापैकी महिला मिळून आली आहे.

पोलीस स्टेशनला बेपत्ता इसमांबाबत मिसिंग दाखल करुन स्थानिक पोलीसांमार्फत शोध घेण्यात येतो. शोधपत्रिका जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला स्थानिक गुन्हे शाखा, अकोला मार्फत पाठविण्यात आल्या आहेत. तसेच बस स्टँड, रेल्वे स्टेशन यासारख्या ठिकाणी लोकांचे निदर्शनास येईल अशा ठिकाणी शोधपत्रिका चिपकविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील अहिल्यादेवी सिंचन विहीर योजनेच्या प्रलंबित कामांबाबत

**(१४) * २००८ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात शेतक-यांचे सिंचन क्षेत्र वाढवुन रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपुर्ण जिल्हयातून सुमारे ४ हजार ९९ अर्ज पंचायत समित्यांमार्फत दाखल झाले असुन यामध्ये भुजल सर्व्हेक्षणाचा दाखला, त्याची मंजुरी, प्राप्त प्रस्तावांची छाननी आणि अंतिम मंजूरी या प्रक्रियेत अनेक प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांना मंजुरी वेळेत मिळत नसुन सदरहू योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाने सदरहू योजनेला अपेक्षीत प्रतिसाद न दिल्यामुळे शेतकऱ्यांची मागणी असतानाही अटी व नियम यामध्ये अडवणुक करुन शेतकरी विहिरीच्या खोदकामांपासून वंचित राहिले असुन प्रशासनाने ३७८ प्रस्ताव नामंजूर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या अटी व नियमामध्ये शिथिलता आणून सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हयात तालुका स्तरावर सिंचन विहिरींचे एकूण ४१४९ प्रस्ताव प्राप्त झाले. अंतिम छाननी करुन तपासणीअंती १८७५ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली. त्यापैकी अनुषंगिक कागदपत्रांअभावी अपात्र केलेल्या ३७८ प्रस्तावामधील त्रुटींची पूर्तता करुन फेरसादर करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुर्ला (मुंबई) स्थानकातून लोकमान्य टिळक टर्मिनसकडे जाणाऱ्या महिलेवर बलात्कार केल्याबाबत

**(१५) * ३३६६ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला (मुंबई) स्थानकातून लोकमान्य टिळक टर्मिनसकडे (कुर्ला) जाणाऱ्या एका महिलेवर दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास चार तरुणांनी बलात्कार केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार या प्रकरणी किती दोषींना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून नेहरूनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. २३/२०२० कलम-३७६ (ड), ३७७, ३५४, ३५४ (अ), ३९४, ५०६, ३४ भादंवि प्रमाणे एकूण चार आरोपींविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील चारही आरोपीतांना अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाढेगांव (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथे फळबाग योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१६) * ७६६ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढेगांव (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथील तालुका कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहायक यांनी राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ वरील शेतकऱ्यांच्या फळबागांचे मुल्यांकन करताना गैरव्यवहार केला असल्याने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी यासाठी माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तेथील नागरीकांनी तीव्र आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही शेतकऱ्यांना ४०००, ३०००, १००० अशाप्रकारचे मुल्यांकन करुन रक्कम दिल्या गेली असुन शेतकऱ्यांना सरसकट रक्कम दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही. तथापि, तक्रारदार शेतकऱ्यांनी एकदिवशीय लाक्षणिक उपोषण केले होते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयात हातपाटी वाळू परवाने न दिल्याबाबत

**(१७) * ४७२१ श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील वाळूवर चिरा बांधकाम, डबर बांधकाम इत्यादी व्यवसाय करणाऱ्या मजूर व व्यावसायिकांना शासनामार्फत रितसर परवाने दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील अशा मजूर व व्यावसायिकांना दोन वर्षाच्या कालावधीसाठी म्हणजेच २४ महिन्यांसाठी परवाने न देता फक्त १० महिन्याचे हातपाटी वाळू परवाने दिले असल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मजुरांना २४ महिन्यांसाठी परवाने दिले जावून पुढील परवान्याची मुदत संपण्याअगोदरच नवीन परवाने जिल्हा प्रशासनामार्फत दिले जात असतांना चालू हंगामासाठी अद्याप परवाने दिले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा प्रशासनाने अद्यापि हातपाटी वाळू परवाने दिले नसल्यामुळे या मजूर व व्यावसायिकांवर बेरोजगारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार सदर मजूर व व्यावसायिकांना तातडीने नवीन परवाने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे आहे.

(२) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

(३), (४) व (५) रत्नागिरी जिल्हयातील वाळूगटामध्ये परवाना पध्दतीने हातपाटीद्वारे उत्खनन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी दि.२१/९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये अनुमती दिली आहे.पर्यावरण विभागाने त्यांच्या दि.२९/१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रातील हातपाटीद्वारे स्थानिक पारंपारिक तटीय क्षेत्रातील लोकांसाठी वाळू उपसा करण्याकरीता EIA Notification, २००६ अंतर्गत स्वतंत्रपणे पूर्व पर्यावरण अनुमती घेण्याचे नमूद करण्यात आले नसल्याचे कळविले आहे.

तसेच हातपाटीद्वारे वाळू काढण्याचे सुधारीत दर निश्चित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. सदर दर निश्चित झाल्यानंतर हातपाटीद्वारे वाळू काढण्याचे परवाने देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्याचे संकल्पित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथील बालिकेचे अपहरण करुन हरियाणा राज्यात विक्री केल्याबाबत

**(१८) * ५०८ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील एका बालिकेचे दहा वर्षापूर्वी महाकाली मंदीर परिसरातून अपहरण करून हरियाणात तिची विक्री करण्यात येऊन तिचा ७ वेळा विवाह केल्याचे तसेच तिच्यावर दोनदा मातृत्व लादले गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरियाणातील फतेहाबाद येथे तिला ज्या घरात डांबून ठेवले होते तेथील घर मालकाला संशय आल्याने हे मानव तस्करीचे प्रकरण माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मानव तस्करी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी अशी मागणी चंद्रपूर येथील अनेक सामाजिक संस्था, संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन रामनगर, जिल्हा चंद्रपूर येथे अप क्र.१५५९/१९ कलम ३६५, ३६६(अ), ३२८, ३७६(ड), ३७०, ३५४, ३६७, ३२३ भा.दं.वि. सह कलम ४ बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२, सह कलम ४, ५, ६ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ प्रमाणे आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यातील ११ आरोपी यांना अटक करण्यात आली असून २ आरोपी यांचा शोध घेणे सुरू आहे. सध्या आरोपी हे न्यायालयीन कोठडीत असून सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील भिमा व इंद्रायणी नदीमध्ये वाळू उपसा करुन खेड तालुक्यातील गावांमधुन मुरुमाचे उत्खनन केल्याबबात

**(१९) * ५२७४ श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमा नदीवरील पारगांव-नागरगांव (जि.पुणे) दरम्यान कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यालगत यांत्रिक बोटीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा केल्याने बंधाऱ्याला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाने बंधाऱ्याला ढापे टाकून बंधारा पूर्ण क्षमतेने अडविला असून शिरुर व दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांना या पाण्याचा मोठा फायदा होतो परंतु वाळू चोरीमुळे बंधाऱ्याच्या तळातील ढापे निसटण्याची भिती निर्माण झाल्याने वाळू उपसा करणाऱ्यावर कारवाईची मागणी शेतकऱ्यांनी महसूल विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, खेड तालुक्यातील भीमा व इंद्रायणी नदीतील वाळूचे व चाकण औद्योगिक वसाहतीच्या विकासाकरिता शिंदेवही, वराळे, शेलू, खालुम्ब्रे, सावरा, बोरदरा या गावातील मुरूमाचे बेकायदेशीररित्या उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भीमा व इंद्रायणी नदीतील वाळूचे व चाकण औद्योगिक वसाहतीच्या विकासाकरिता शिंदेवही, वराळे, शेलू, खालुम्ब्रे, सावरा,बोरदरा या गावातील मुरूमाचे बेकायदेशीररित्या उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) शिरुर तालुक्यातील मौजे नागरगाव येथे कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यालगत यांत्रिक बोटीच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा होत असल्याचे दृष्टोपत्तीस आले आहे.

(२), (३) व (४) मौजे नागरगाव बंधाऱ्यानजिकच्या शेतकऱ्यांनी दि.३/१/२०२० रोजी तहसिलदार, शिरुर यांचेकडे समक्ष भेटून उक्त बंधाऱ्याच्या तळातील ढापे निसटण्याची भिती असल्याची तोंडी तक्रार केली होती. त्यानुषंगाने दि.४/१/२०२० रोजी सदर बंधाऱ्यातून वाळूचे अवैध उत्खनन करणारी यांत्रिकी

बोट आढळून आल्याने सदर यांत्रिकी बोटीची मोडतोड करुन निकामी करण्यात आली आहे.

खेड तालुक्यातील भिमा व इंद्रायणी नदीपात्रातील वाळूचे तसेच मौजे शिंदे, शेलू, सावरदरी व बोरदरा या गावामधून माती व मुरुमाचे अवैध उत्खनन व वाहतूक झाल्याची बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

मौजे वराळे, ता.खेड येथील गट नं.१६८/२ व १६८/६ या जमिनीतून तसेच मौजे खालुम्ब्रे, ता.खेड येथील गट नं.१०८ या जमीनीतून मुरुम या गौण खनिजाचे अवैध उत्खनन झाल्याचे आढळून आल्याने संबंधितांविरुध्द तहसिलदार, खेड यांनी अनुक्रमे दि.३१/१२/२०१९ व दि.१/२/२०२० रोजी रु.१,९६,०७,८००/- व रु.६४,८२,४००/- इतक्या रक्कमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यामध्ये पशुधन विकास अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासह पशुधनाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२०) * ११०० श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यासाठी पशुधन विकास अधिकारी नसून एकूण १८ पशु दवाखान्यांमध्ये एकही पशुधन अधिकारी नसल्याने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर पशुधन पाळणाऱ्या शेतकऱ्यांना खासगी डॉक्टरांमार्फत उपचार करून घ्यावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने माहे डिसेंबर मध्ये तालुक्यातील मेंढपाळांच्या सुमारे २० हजार मेंढ्या मृत्यूमुखी पडून मेंढपाळांचे २४ कोटींचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदगाव तालुक्यामध्ये पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासह पशुधन पाळणाऱ्या नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१), (२) व (३) नांदगाव तालुक्यात पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ च्या ९ व श्रेणी २ च्या ९ अशा एकुण १८ पशुवैद्यकीय संस्था आहेत. पशुधन विकास अधिकारी या संवर्गातील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेसह एकुण १० पदे मंजूर असुन सर्व पदे रिक्त आहेत. पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ च्या ९ संस्था असून त्यापैकी ३ पशुधन पर्यवेक्षक यांची पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांच्या ठिकाणांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांचे कडे सोपवून नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविल्या जात आहेत.

पशुधन विकास अधिकारी (गट-अ) यांची ४३५ रिक्त पदे सरळ सेवा भरतीने भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फ़त कार्यवाही सुरू करण्यात आली असून दि. २२.१२.२०१९ रोजी चाळणी परिक्षा घेण्यात आली आहे. सदर ४३५ पदांची शिफारस आयोगाकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर तसेच येत्या नियतकालिक बदली २०२० मध्ये नांदगाव तालुक्यातील पशुधन विकास अधिका-यांची रिक्त पदे प्राधान्याने भरण्याचे संकल्पित आहे.

नांदगाव तालुक्यात माहे सप्टेबर २०१९ मध्ये PPR रोगाची लागण होवून १७ मेंढ्यांचा व माहे डिसेंबर २०१९ मध्ये ५२ मेंढ्यांचा मृत्यु झालेला आहे.

केवळ नैसर्गिक आपत्तीमुळे पशुधनाचा मृत्यू झाल्यास त्यांना भरपाई देय असून प्रस्तूत प्रकरणी PPR या रोगाने मृत्यु पावलेली असल्याने त्यांना शासनाकडून कोणतीही भरपाई देय होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामवाडी (विठ्ठलवाडी), कामोणे (ता.करमाळा, जि.सोलापूर) या गावातील रहिवाशी शासकीय योजनांपासून वंचित असल्याबाबत

**(२१) * ५००९ श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामवाडी (विठ्ठलवाडी), कामोणे (ता.करमाळा, जि.सोलापूर) या गावांतील अनेक रहिवाशांच्या सातबारा उताऱ्यावर फॉरेस्ट आणि गायरान अशी नोंद

येत असून सरपडोह या गावातील ८० टक्के जमिनी देवस्थानच्या नावावर आहेत त्यामुळे तेथील नागरिकांना शासनाच्या सवलती मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या गावातील लोकांना शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ तसेच कोणत्याही बँकेचे कर्जप्रकरण करता येत नाही, वारस नोंदी लावता येत नाही तसेच जमिन खरेदी-विक्री करता येत नसल्यामुळे सदर गावातील जमिनी वर्ग-३ वरून वर्ग-१ करण्याची मागणी सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गावातील नागरीकांच्या मागणीनुसार शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार याबबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) व (२) मौजे रामवाडी, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील गट नं.२० व २१ हया जमिनी “राखीव वन” संवर्गातील आहेत. त्यापैकी गट नं.२०/१, २०/२, २०/३, २०/७ व २०/८ मधील काही क्षेत्र कायम लागणीसाठी भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकारावर वाटप झाल्याचे दिसून येत आहे.

तसेच मौजे कामोणे, ता.करमाळा,जि.सोलापूर येथील गट नं.२५, ३३, ३४ व ३५ मधील क्षेत्र निर्वणीकरणानंतर कब्जेदारांनी भोगवटादार वर्ग २ धारणाधिकारावर धारण केलेले दिसून येत आहे, तर मौजे कामोणे, ता.करमाळा येथील गट नं.३२ मधील क्षेत्र कायम स्वरुपी भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकारावर वाटप झाल्याचे दिसून येत आहे.

मौ.सरपडोह येथील बहुतांश जमिनी “देवस्थान ईनाम वर्ग-३” संवर्गातील आहेत.

मौजे रामवाडी व कामोणे येथील भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीवर कृषिक कारणासाठी कर्ज घेण्याकरीता कोणत्याही परवानगीची आवश्यकता नाही. तसेच अशा जमिनीवर नियमाप्रमाणे वारस नोंदी लावण्यात येतात.

मौजे सरपडोह येथील देवस्थान इनाम वर्ग-३ जमिनीवर वहिवाटदारांची नावे अभिलिखित आहेत. सद्य:स्थितीत देवस्थान इनाम जमिनी विक्री करता येत नाही व अशा जमिनी देवस्थान इनाम वर्ग-३ मधून वर्ग-१ करता येत नाहीत. देवस्थान इनाम जमिनीसंदर्भात अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात उचित धोरणात्मक निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील अनधिकृत उत्खननाबाबत

**(२२) * २१३७ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील पडघा ग्रामपंचायत हद्दीत गायरान जमिनीवरील टेकड्या फोडून व येथील उंच सखल ठिकाणी बांधकाम केलेल्या इमारतीच्या खालचा भाग पोखरून अनधिकृत माती खोदकाम होत असून येथील टेकड्यांवर व टेकड्यांच्या उतारावर झालेल्या अनधिकृत बांधकामांना संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांचे पाठबळअसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी येथे सरकारी जमीन, गुरचरण जमिन, खासगी भूखंडासह डोंगरावर भर दिवसा भूमाफीयांकडून कोट्यवधी रुपयांच्या मातीचे उत्खनन करण्यात येत असून याप्रकरणी ग्रामस्थांनी तहसिलदार यांच्याकडे तक्रार केल्यानंतर तहसिलदारांनी या भूमाफीयांवर सन २०१८ मध्ये २४ कोटी ९४ लाखाचा दंड आकारुन गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊन २ वर्षाचा कालावधी झाला असतानाही या भूमाफियांवर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच भिवंडी येथील उल्हास नदी खाडी, कोनगाव, अलिमघर, वेहळे, पिंपळास या खाडी पात्रात बेकायदेशीररित्या रेती माफीया सक्शन पंप व लोखंडी बार्जव्दारे मोठ्या प्रमाणात अवैधरित्या रेती उपसा करुन पर्यावरणाचा ऱ्हास करीत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरीकांनी जिल्हाधिकारी, ठाणे, प्रांत अधिकारी, भिवंडी यांच्याकडे केल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी चौकशी करून दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच किती दंड वसूल करण्यात आला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

(३) अशा प्रकारच्या स्थानिक नागरिकांच्या लेखी व तोंडी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(४) माहे एप्रिल, २०१९ ते माहे जाने, २०२० या कालावधीत भिवंडी तालुक्यात गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ७१ प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रुपये ३२,५१,०००/- रक्कम शासनजमा करणेत आलेली आहे.

उल्हासनदीखाडी/कोनगाव/अलिमघर/वेहेळे/पिंपळास या क्षेत्रात वाळूच्या अवैध उत्खनन प्रकरणी कारवाई करुन सक्शनपंप/ बार्ज असे मिळून ४५ साधनसामुग्री जप्त करुन नष्ट करणेत आली आहे. तसेच वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीचे एकूण ८ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.धुमका (ता.जि.वाशिम) जलसिंचन प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(२३) * ३२४२ ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.धुमका (ता.जि.वाशिम) लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या उजव्या मुख्य कालव्यासाठी मौजे उकळीपेन (ता.जि.वाशिम) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सन २००३-०४ मध्ये संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी भूसंपादनाचा अंतिम निवाडा होऊन संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यात यावा असे भूसंपादन अधिकारी, वाशिम यांनी उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग तसेच कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास मंडळ यांना सन २०१५ मध्ये लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानंतर १४ वर्षे एवढा कालावधी होऊनही संबंधित शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला देण्यांत आला नसल्यामुळे त्यांनी जमिनीचा दुबार मोबदला, भूभाडे, व्याज व पिकांची नुकसान भरपाई ३० दिवसांत द्यावी अन्यथा सामुहिक आत्मदहन करणार असल्याचा इशारा निवेदनान्वये शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इतका प्रदीर्घ कालावधी होऊनही अद्याप संबंधित शेतकऱ्यांना मोबदला न देण्याची कारणे काय व त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) तसेच सदर कालव्यावर भरावाचे ठिकाणे संसाधान व ग्राऊटेड पिचिंग बांधकामाकरिता रक्कम १४,८९,०४६/- खर्च झाल्याचे दाखविण्यात आले परंतु त्याचा जमिनीला लाभ झालेला नाही तरी या प्रकरणी सुद्धा चौकशी करुन कारवाई करण्यांत आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) व (२) नाही.कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, वाशिम यांनी दि.०३.०५.२०१६ नुसार जिल्हाधिकारी कार्यालयास भूसंपादन प्रस्ताव सादर केला असून सदर प्रकरणीचा अंतिम निवाडा दिनांक ११.०९.२०१९ रोजी घोषित करण्यात आला. निवाडा निधीची मागणी सबंधित यंत्रणेकडे जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ३१.१०.२०१९ रोजी करण्यात आली. तथापि अद्याप निवाडा निधी प्राप्त झालेला नाही. त्यामुळे मोबदला वाटप बाकी आहे.

(३) होय, हे खरे आहे. यासंदर्भात दि.२ जानेवारी, २०२० रोजीच्या निवेदनाव्दारे सामुहिक आत्मदहनाचा इशारा प्राप्त झाला होता.

(४) या प्रकरणी उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, वाशिम यांनी भूसंपादन प्रकरणात अंतिम निवाडा दि. ११.०९.२०१९ रोजी पारीत केला असून, संबंधित यंत्रणेकडे दिनांक ३१.१०.२०१९ रोजी निधीची मागणी केली आहे. अद्यापपर्यंत भूसंपादन संस्थेने निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.

(५) मौ. धुमका लघुपाटबंधारे योजनेकरीता उजव्या मुख्य कालव्यावर भरावाचे ठिकाणी संधानक व ग्राऊटेड पिंचींग व बांधकाम करण्याचे काम रु.१४,८९,०४६/-च्या निविदेव्दारे देण्यात आले होते. सदर कामापोटी दि.०७.०७.२००७ पर्यंत रु.१०,६२,७२३/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. सदर करारनाम्यातर्गंत काम शिल्लक असल्याने करारनामा अंतिम करण्यात आलेला नाही.

उजव्या कालव्यावरील कालव्याचे खोदकाम, भरावकाम व इतर बांधकामे शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे अपूर्ण आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील सह दुय्यम निबंधकांना ई-म्युटेशन पध्दतीने नोंदणी करण्याच्या दिलेल्या आदेशाबाबत

**(२४) * १९६७ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, परभणी यांनी दिनांक ७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास परभणी जिल्हयातील सर्व सह दुय्यम निबंधकांना नोंदणी करतांना ई-म्युटेशन पध्दतीने नोंदणी करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराचा सिटी सर्वे ४० वर्षापासून रखडलेला असल्यामुळे हजारो नागरीकांकडे पीआर कार्ड नसल्याने तसेच सातबारावर प्लॉटच्या नोंदी नसल्यामुळे गेल्या कांही दिवसापासून दस्तनोंदणी व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सर्वसामान्य नागरीकांच्या दस्तनोंदणीचे व्यवहार सुरळीत सुरु होण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) ज्या भागात मिळकत पत्रिका अंमलात आहेत त्या भागांमध्ये ई-म्युटेशन प्रणाली अद्याप कार्यान्वीत व्हावयाची आहे. त्यामुळे, सह जिल्हा निबंधक, परभणी यांचे उक्त निदेश फक्त ज्या भागात अधिकार अभिलेख गा.न.नं.७/१२ स्वरुपात आहेत अशा भागातील दस्तांचे बाबतीत लागु आहेत.ज्या मिळकतीचे गा.न.नं ७/१२ आद्यावत आहेत त्यांचे खरेदी-विक्री व्यवहार चालु आहेत.

ज्या पक्षकारांची नावे गा.न.नं ७/१२ वर मालकी हक्कात नोंद झालेली नाही व महसूल विभागाकडे त्यांच्या गा.न.नं ७/१२ नोंदीची कार्यवाही सुरु आहे, अशा पक्षकारांना दस्ताची नोंदणी करावयाची झाल्यास, परभणी तहसिल कार्यालयात स्वतंत्र कक्ष उघडण्यात आला आहे. परभणी जिल्हयात अन्य तालुक्यात अशी समस्या दृष्टोपत्तीस आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साष्टपिंपळगाव (ता.अंबड, जि.जालना) येथे अवैध वाळू उपसा केल्याबाबत

**(२५) * ५३२१ श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साष्टपिंपळगाव (ता.अंबड, जि.जालना) येथे वाळू साठ्याची चार दिवसाची निविदा निघाल्याचे भासवून एक ते दीड कोटींचा अवैध वाळू उपसा करून प्रशासनाचा महसूल बुडविल्याची घटना घडल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधीत वाळू माफीयांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) साष्टपिंपळगाव (ता.अंबड, जि.जालना) येथे वाळू साठ्याची चार दिवसाची निविदा निघाल्याची भासवून अवैध वाळूचा उपसा केल्याची बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

तथापि, दि.९/१/२०२० रोजी मौजे राक्षस भुवन, ता.गेवराई येथील एक आरोपी व ४० ते ५० अज्ञात व्यक्ती मौजे साष्टपिंपळगाव, ता.अंबड येथे गोदावरी नदीपात्रामध्ये वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक करीत असल्याचे आढळून आल्याने त्यांच्याविरुध्द गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच दि.१९/१/२०२० व दि.२४/१/२०२० रोजी मौजे साष्टपिंपळगाव येथील गोदावरी नदीपात्रामध्ये वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ७ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.११,८८,०००/- इतकी रक्कम शासनजमा केली आहे.

अंबड (जि.जालना) तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीला प्रतिबंध घालण्यासाठी महसूल कर्मचारी व पोलीसांची भरारी पथके स्थापन करण्यात आली असून सदर पथकामार्फत अंबड तालुक्यात माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ८९ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.४५,११,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच अवैध वाहतूकीच्या ३६ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना देय असलेली रक्कम देण्याबाबत

**(२६) * ७९१ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यात माहे सप्टेंबर ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत शासनाने ६ दूध संस्थांची सुमारे १ कोटी ५० लाख इतकी रक्कम दिली नसल्यामुळे दुध उत्पादक शेतक-यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लांजा तालुक्यात ६ दुध उत्पादक संस्था कार्यरत असून या दुध संस्थांकडे दुध उत्पादक शेतकरी दुध विक्रीसाठी देत असून सदरहू दुध संस्थांकडे संकलन झालेले दुध शासकीय योजना रत्नागिरी यांना पुरवितात, मात्र त्याप्रित्यर्थ देय असलेली उपरोक्त रक्कम शासनाने आजमितीस अदा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुध उत्पादक शेतक-यांना त्याची देय असलेली रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१), (२) व (३) लांजा तालुक्यातील ७ दुध उत्पादक संस्थांना माहे सप्टेंबर ते डिसेंबर २०१९ या कालावधीत रु. १.२८ कोटी इतकी रक्कम देणे प्रलंबित होती. त्यापैकी रु.७०.७२ लाख इतकी रक्कम देण्यात आलेली आहे.

उर्वरित माहे डिसेंबर २०१९ अखेर रु.५७.७६ लाख इतकी रक्कम अदा करण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागणी विधानमंडळास सादर करण्यासाठी प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) * २७४६ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाला असुन मृद व जलसंधारण, संरक्षण भिंती, सिमेंट काँक्रिट, नाल्या, पांदण रस्ते आदी कामांमध्ये अनियमितता असुन बांधकाम उपविभागातील कामात किरकोळ कामे दर्शवून लाखोंची देयके काढण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी यांनी कामांचा आढावा व तपासणी केल्यास मोठा गैरव्यवहार निदर्शनास येऊ शकतो, परंतु त्यांच्याच काळातील कामकाजाच्या पध्दतीवर चौकशी सुरु असल्याने जिल्हा प्रशासन अधिकारी अनियमिततेबाबत गंभीर नसल्याने तहसीलदार व गटविकास अधिकारी आपल्या अधिनस्त कामांची उद्दिष्टनिहाय पाहणीच करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने आर्णी तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून या कामांमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार आढळून आलेला नाही.

-----------------

## वांद्रे (मुंबई) येथे वेश्या व्यवसायासाठी नवजात बालिकेची विक्री केल्याबाबत

**(२८) * ६०५३ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथे वेश्या व्यवसायासाठी नवजात बालिकेची विक्री करण्याऱ्या टोळीला गुन्हे शाखेने अटक करून १५ ते २० दिवसांच्या बालिकेची सुटका केल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालिकेच्या आईनेच मुलीला २५ हजार रुपयांना या टोळीला विक्री करण्याबाबत ठरविल्याचे चौकशीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित टोळी ही परप्रांतीय असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित टोळीवर व इतर दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ७०/२०२० कलम ३७०(४), ३४ भा.द.वि. सह कलम ८१ बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यातील आरोपीतांना अटक करून सदरचा गुन्हा पुढील तपासाकरीता गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आल्यावर गुन्हे प्रकटीकरण शाखा गु.र.क्र. २७/२०२० अन्वये घेण्यात आला. सदर गुन्ह्याच्या पुढील तपासात आणखी ०२ महिला आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. मा.न्यायालयाच्या आदेशान्वये सदर पाचही आरोपी हे पोलीस कोठडीत असून सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सायबर गुन्ह्यांमध्ये झालेली वाढ

**(२९) * ४५० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.चंद्रकांत निंबा पाटील (मुक्ताईनगर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१५ ते माहे ऑक्टोबर, २०१९ पर्यंत १६,०५१ सायबर गुन्ह्याची नोंद झाली असून त्यापैकी केवळ ४,४३४ (२८ टक्के) गुन्ह्यांची उकल होऊन उर्वरित ७२ टक्के सायबर गुन्ह्यांचा तपास पूर्ण झाला नसल्याचे तसेच दररोज सरासरी किमान ३३ ते ३५ नव्या गुन्ह्यांची नोंद होत

असल्याचे दिनांक ०८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकाच्या निष्काळजीपणामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे बँकांमध्ये खाते उघडण्यात येत असल्याने सायबर गुन्हयांमध्ये वाढ होत असून राज्यात पेटीएम केवायसी अपडेट करण्याच्या नावाखाली वाढत्या फसवणुकीच्या गुन्हयांना आळा बसण्यासाठी मुंबई पोलीसांनी अर्जंट फ्रॉड (पेटीएम) नावाचा ग्रुप तयार केला त्यामध्ये युपीआय हेड, पेटीएम, सायबर सेलसह राज्य भरातील पोलीस अधिकारी यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सायबर गुन्ह्यांमध्ये एटीएम मधून परस्पर रक्कम वळती करणे, सोशल साइटवरुन धमक्या, अश्लील ट्रोलींग, अश्लील साहित्य, जातीय वाद पसरविणे इत्यादी गुन्ह्यांची संख्या प्रचंड वेगाने वाढत असल्याने याचा सामना करण्याकरिता पुरेशा प्रमाणात प्रशिक्षित सायबर पोलिसांची नेमणूक करून अत्याधुनिक यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) राज्यात सन २०१५ ते सन २०१९ दरम्यान एकूण १६५१५ इतक्या गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी ४५३२ इतक्या गुन्ह्यांची उकल झाली झाली आहे. तसेच ६०२० आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) बँकांकडून कागदपत्रांची नीट पडताळणी न झाल्याने उघडल्या गेलेल्या खात्यांमुळे होणाऱ्या बऱ्याच गुन्हयात बँकेकडून पोलीसांकडे तक्रारी दाखल होत नाहीत.

वाढत्या फसवणुकीच्या गुन्ह्यांना आळा बसण्यासाठी अर्जंट फ्रॉड (पेटीएम) नावाचा ग्रुप मुंबई पोलिसांनी तयार केलेला नाही. परंतु पेटीएम चे नोडल अधिकारी यांनी अर्जंट फ्रॉड (पेटीएम) नावाचा ग्रुप तयार केला असून त्यामध्ये पेटीएम चे नोडल अधिकारी, फ्रॉड टीम तसेच मुंबईसह महाराष्ट्र राज्य व इतर राज्यातील पोलीस अधिकारी/अंमलदार हे अर्जंट फ्रॉड (पेटीएम) या Whats app ग्रुपचे सभासद आहेत.

(३) संपुर्ण महाराष्ट्रातील सायबर गुन्हयांचा तपास अधिक प्रभावीपणे होण्यासाठी विविध पोलीस घटकातील एकूण ३२५३ पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

तसेच राज्यातील सर्व पोलीस सायबर लॅब/सायबर ठाणेना गुन्हयाच्या तपासाकरिता आत्याधुनिक यंत्रसामुग्री (सॉफ्टवेअर व हार्डवेअर) पुरविण्यात आली आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांनी शेततळे बांधण्यास असमर्थतता दर्शविल्याबाबत

**(३०) * ५५८८ श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत मागील ४ वर्षात सुमारे २९३१६ शेतकऱ्यांनी अर्ज केले असुन २५ एकर १९४ शेतकऱ्यांना जागा पडताळणी करुन कार्यारंभ करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी केवळ ९६६२ शेतकऱ्यांनी शेततळे बांधून पूर्ण केली असून १५४२६ शेतकऱ्यांनी शेततळी बांधण्यास असमर्थतता दर्शविली असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेततळे बांधकामास असमर्थतता दर्शविणाऱ्या शेतकऱ्यांनी शासनाकडून अनुदान प्राप्त होण्यास लागणारा विलंब, आर्थिक अडचणी तसेच शासनाकडून त्यासाठी मिळणाऱ्या अनुदानापेक्षा होणारा दुप्पट खर्च इत्यादी कारणे दर्शवून या योजनेचा फेरविचार करण्यात यावा अशी त्यांनी शासनाकडे विनंती केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हयात जानेवारी, २०२० अखेर ३६४६४ अर्ज प्राप्त झाले असून २५४७३ शेततळे कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे,

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत अभिसरणाद्वारे शेततळ्यांची कामे घेण्याबाबत शासनाने दिनांक ४ जुलै, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. तद्नुसार शेततळी खोदण्याच्या अनुदानात वाढ झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील देहविक्रय रॅकेटना कायमस्वरूपी आळा घालण्याबाबत

**(३१) * ५४५५ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू, मुंबई येथील झेड लक्जरी रेसिडेन्सी या तारांकित हॉटेलमध्ये धाड टाकून देहविक्रय रॅकेट चालवणाऱ्या बॉलिवूडमधील एका निर्मिती व्यवस्थापकाला (प्रॉडक्शन मॅनेजर) जुहू पोलिसांनी दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुलाबा येथील एका हॉटेलमध्ये माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ऑनलाईन पद्धतीने सुरू असलेले सेक्स रॅकेट तसेच प्रभादेवी येथील एका इमारतीत स्पा सेंटरच्या नावाखाली सुरु असलेले सेक्स रॅकेट मुंबई पोलिसांनी धाड टाकून उध्वस्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून मुंबईतील सुरु असलेल्या देहविक्रय रॅकेटना कायमस्वरूपी प्रतिबंध घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) होय.

(३) देहविक्रय घटनेबाबत जुहू, कुलाबा व दादर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर गुन्हयांचा पोलीस तपास चालू आहे.

अनैतिक व्यापारास प्रतिबंध घालण्याबाबत करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहे :-

i) मुंबई शहरात स्पा, हॉटेल, खाजगी फ्लॅट या ठिकाणी देहविक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाल्यास समाजसेवा शाखा, गुन्हे शाखा, मुंबई विभाग हे बोगस गिऱ्हाईका मार्फतीने वेळोवेळी धाडी टाकून देह विक्री करण्यास प्रवृत्त करणाऱ्या इसमांविरूध्द भा.दं.वि.सं व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये कारवाई करण्यात येते.

ii) पोलीस ठाणे हद्दीतील कार्यन्वीत कुंटनखाने, Escorts Service च्या नावाने जाहिरात करून वेश्याव्यवसायासाठी मुंबईतील हॉटेलमध्ये वेश्यागमनाकरीता मुली पुरविणा-या वेबसाईटधारक व वेश्यादलाल यांचे विरूध्द भा.दं.वि.सं व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये कारवाई करण्यात येते.

iii) गुन्ह्यातील इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या वेबसाईटवरून गुन्हे घडत असल्याची शक्यता लक्षात घेवून ती वेबसाईट ब्लॉक/बंद करणेसाठी मा.न्यायालयात विनंती अर्ज सादर करून सदर वेबसाईट इंटरनेटवर दिसणे बंद करणेकरीता संबंधित यंत्रणेच्या नावे आदेश प्राप्त करून सदर वेबसाईट ब्लॉक/बंद करण्यात येतात.

iv) बृहन्मुंबई शहरातील सर्व पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी/अंमलदार यांचेसाठी अनैतिक व्यापार संबंधित काम करणा-या वेगवेगळ्या समाजसेवी संघटनांचे प्रतिनिधी (एन.जी.ओ.), कायदे तज्ञ, अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, मुंबई येथे कार्यरत असलेले अनुभवी पोलीस अधिकारी यांच्या मार्फतीने कार्यशाळांचे आयोजन करून त्यांना पोलीस ठाणे हद्दीतील कार्यन्वीत कुंटनखाने, Escorts Service चे वेबसाईटधारक व वेश्यादलाल यांचे विरूध्द परिणामकारक कशा प्रकारे कारवाई कराव्यात याबाबत मार्गदर्शन देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अंधेरी (पूर्व) मरोळ येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या इमारतीमधील सदनीकांचा ताबा अज्ञात व्यक्तींनी घेतल्याबाबत

**(३२) * ५१०२ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंधेरी (पूर्व) मरोळ औद्योगिक क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमधील ६८ सदनिकांचा ताबा अनधिकृतरित्या अज्ञात व्यक्तींनी घेतल्याची तक्रार दिनांक २१ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास विकासक हब टाऊन यांनी व दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास उप अभियंता, मरोळ उपविभाग यांनी एम.आय.डी.सी. पोलिस ठाणे, अंधेरी (पूर्व) यांच्याकडे पत्राद्वारे गुन्हा दाखल करण्याकरिता केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेतील पात्र झोपड्पट्टीधारकांना लॉटरीद्वारे मिळालेल्या सदनिकेचा ताबा मिळत नसल्याबाबत तक्रारही झोपड्पट्टीधारकांनी पोलीस उपायुक्त व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एम.आय.डी.सी. पोलिस ठाणे यांच्याकडे केली असून तक्रार केल्यानंतर ९ महिने होऊनही वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एम.आय.डी.सी. पोलिस ठाणे, अंधेरी (पूर्व) यांनी सदर तक्रार गांभीर्याने न घेता अनधिकृतरित्या ताबा घेणाऱ्यांवर आजपर्यंत गुन्हे दाखल केले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात अनधिकृत ताबा घेणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे कळविल्यानंतरही चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गंभीर प्रकरण योग्य पद्धतीने न हाताळता अनधिकृतरित्या ताबा घेणाऱ्या व्यक्तींना सहकार्य करून चौकशी व गुन्ह्यांची नोंद न करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणाची गांभिर्याने दखल घेण्यात आली असून एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७५/२०२०, भा.दं.वि. कलम ३४१, ४४८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(३३) * १६२३ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील विविध परिसरातून एका विशेष मोहिमेंतर्गत गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईत पाच बोगस डॉक्टरांना अटक केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुठलीही वैद्यकीय पदवी नसताना सदर पाचही डॉक्टर रुग्णांना बरे करण्याचे आश्वासन देऊन त्यांची फसवणूक करित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात बोगस डॉक्टर कार्यरत असून ते दहावी ते बारावीपर्यंत शिक्षण घेतलेले आहे तसेच ते कुठलाही आजार बरा करण्याचा दावा करून रुग्णांकडून मोठी रक्कम घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून गरीब व गरजू रुग्णांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या बोगस डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी बृहन्मुंबईतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये भा.दं.वि. कलम ३३६, ४१९, ४२० सह ३३, ३४, ३६ महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट, १९६१ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत सर्व गुन्हे तपासाधिन आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातुन मागील दोन वर्षात एक हजार मुली बेपत्ता झाल्याबाबत

**(३४) * ३०२१ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातून मागील दोन वर्षात एक हजार मुली बेपत्ता झाल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातुन दिनांक १ जानेवारी, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीमध्ये बेपत्ता झालेल्या मुलींपैकी १७० मुलींचा व अपहरण झालेल्या ५३ मुलींचा शोध घेण्यास जिल्हा पोलीस प्रशासनास अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(४) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील वाढती गुन्हेगारी व महिला बेपत्ता होण्याचे प्रकार थांबविण्यात अपयश आलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व अशा घटना जिल्हयात घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) बुलढाणा जिल्हा पोलीस घटकामध्ये सन २०१८ मध्ये मुली/महिला हरविल्याबाबत ४५८ प्रकरणे नोंद असून एकूण हरविलेल्या महिला व मुलींची संख्या ४६२ आहे. तर सन २०१९ मध्ये ५५७ प्रकरणे नोंद आहेत. एकूण हरविलेल्या मुली/महिलांची संख्या ५६१ आहे.

(२) नमुद कालावधीमध्ये एकूण ४६३ हरविलेल्या मुली/महिला पैकी ३८० महिला व मुली यांचा शोध घेण्यामध्ये जिल्हा पोलिसांना यश आले आहे.उर्वरित शोध न लागलेल्या ८३ मुली व महिलांचा शोध घेण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

नमुद कालावधीमध्ये दाखल गुन्हयातील एकूण ६९ हरवलेल्या मुली/महिला पैकी ५१ महिला व मुली यांचा शोध घेण्यामध्ये जिल्हा पोलीसांना यश आले आहे. उर्वरित शोध न लागलेल्या १८ मुली व महिलांचा शोध घेण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

(३) सदर गुन्हयांच्या तपासामध्ये संबंधीत मुली या त्यांच्या स्वमर्जीने घरगुती किंवा कौटुंबिक वादातून तसेच परीक्षेमध्ये आलेल्या अपयशातून घर सोडून गेल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयांच्या तपासामध्ये मुलींना गुन्हेगारी प्रवृत्तीतून पळवून नेल्याची बाब निष्पन्न झालेली नाही.

(४) स्त्रियावरील अत्याच्याराच्या गुन्हयांना प्रभावी प्रतिबंध करण्यासाठी खालीलप्रमाणे विविध उपक्रम संपूर्ण जिल्हयामध्ये राबविण्यात आलेल्या आहेत :

१. महिला/मुलींची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी महिला दक्षता समिती, महिला तक्रार निवारण पेटी, मनोधैर्य योजना याव्दारे जनजागृती करुन अशा घटना घडू नयेत यासठी “कळी उमलताना” या प्रकल्पांतर्गत महिला स्वसंरक्षण ची प्रात्यक्षिकाव्दारे जनजागृती करण्यात येत आहे.

२. महिला हेल्पलाईन नंबर १०९१ व ८६९८०००११, चाईल्ड हेल्पलाईन नंबर १०९८, "प्रतिसाद" नावाचे मोबाईल ॲप, "दामिनी पथक", "स्वयंसिध्दा पथक", शाळा व महाविद्यालये येथे "पोलीस काका", "पोलीस दिदी" तसेच "बडी कॉप" यासारखे उपक्रम सुरु करण्यात आले आहेत.

३. हरविलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी "ऑपरेशन मुस्कान" राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील द्राक्ष व डाळींब बागांवर शेडनेट उभारण्याकरिता अनुदान मिळण्याबाबत

**(३५) * १५१८ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील द्राक्ष व डाळींबाच्या बागांवर प्लास्टिक आच्छादन व शेडनेट करण्याकरिता अनुदान मिळण्यासाठी तत्कालिन कृषि मंत्री यांच्या समवेत बैठका व दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयातील द्राक्ष व डाळींबाच्या बागांवरती प्लास्टिक आच्छादन व शेडनेट करण्याकरिता अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) तालुक्यातील शेततळयांचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(३६) * ४३९६ श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेती सिंचनाची समस्या असल्यामुळे मागेल त्याला शेततळे देण्याची आवश्यकता असतानाही शेततळे देण्याचे प्रस्ताव मंजूर केले जात नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार जत तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करता जास्तीत जास्त शेततळे प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

जत (जि.सांगली) तालुक्यात ११७७ शेततळे पूर्ण झाले असून ५५ कामे प्रगतीपथावर आहे.

(२) (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलिसांना हेलिकॉप्टर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) * ३१४६ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवरील दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबई पोलिसांनी अद्यावत शस्त्रसामुग्री व हेलिकॉप्टरची मागणी केली असून या प्रस्तावाला सन २०१८ मध्ये राज्याच्या गृह मंत्रालयाने मंजुरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र अद्यापही मुंबई पोलिस हेलिकॉप्टरच्या प्रतिक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या मंजुरीनुसार मुंबई पोलिसांना हेलिकॉप्टरचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१), (२) व (३) मुंबईवरील दिनांक २६.११.२००८ रोजीच्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबई पोलिसांनी वेळोवेळी राज्य वार्षिक योजना, पोलीस आधुनिकीकरण कार्यक्रम व इतर शीर्षाखालील शस्त्रे व दारुगोळा उपलब्ध करुन देण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने वेळोवेळी मान्यता दिली असून त्या अनुषंगाने विहित खरेदी प्रक्रिया राबवून सदर आधुनिक शस्त्रे व साधनसामुग्री मुंबई पोलिसांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तथापि, हेलिकॉप्टर उपलब्ध करुन देण्याबाबत पोलीस विभागामार्फत कोणताही प्रस्ताव शासनास सादर केलेला नाही व अशा प्रकारच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(३८) * ३००१ श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील कुंद्राळ कॅम्प ते कर्नाटक सीमा राज्यातील वझर या गावापर्यंत ४५ किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ (अ) चे काम मागील काही वर्षापासून अजयदिय कन्स्ट्रक्शनकडून प्रगतीपथावर असून सदर कंपनीकडुन राष्ट्रीय महामार्गासाठी लखमापूर, वळंकी येथील वन विभागाच्या जागेवरुन व वंटगीर या गावात अवैध मुरुम उत्खनन केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अवैध उत्खननामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत असुन प्रशासनाच्या नियमानुसार राष्ट्रीय महामार्गापासून अंदाजे १ किमी अंतरावरुन महसूल विभागाच्या परवानगीने मुरुम उत्खनन करणे बंधनकारक असतांना सदर कंपनीकडुन नियमबाह्य उत्खनन सुरु असुन संबंधित अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून उक्त कंपनीवर व संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गुहागर-विजापूर महामार्गाच्या भूसंपादनाच्या मोबदल्यापासुन शेतकरी वंचित असल्याबाबत

**(३९) * २०२० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर-विजापूर महामार्गाच्या रूंदीकरणाचे काम मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे यापूर्वी भूसंपादन झालेल्या जमिनीचा मोबदला अद्यापी त्यांना मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरहू शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

गुहागर-चिपळूण-कराड-विजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ ई या रस्त्याचे पेव्हड शेल्डरसह दुपदरीकरण करण्याचे काम मंजूर झालेले आहे.

(२) हे, खरे नाही.

जुन्या गाव नकाशात सदर रस्त्याची नोंद असुन सदर गुहागर-चिपळूण-कराड-विजापूर या रस्त्यांसाठी जमीनीचे यापूर्वी संपादन झालेले नाही.

ज्या ठिकाणी वाढीव खाजगी जमीन संपादन करावी लागणार आहे, त्याबाबतचा भूसंपादनाचा प्रस्ताव संपादन संस्थेकडून जिल्हाधिकारी कार्यालयास अद्याप प्राप्त झालेला नाही.

सद्यस्थितीत शासनाच्या पूर्वीच्या जागेमध्ये रूंदीकरणाचे काम चालु असल्याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभाग यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास कळविले आहे.
(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) येथील श्री. गणेशा सायबर कॅफेच्या संचालकाने शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(४०) * १८०१ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि.यवतमाळ) येथील श्री. गणेशा सायबर कॅफेच्या संचालकाने एकून ६४९ शेतकऱ्यांना पीक विमा हप्ता भरल्याच्या बनावट पावत्या देवून सुमारे ११ लाख ८९ हजार ९३४ रुपयांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी आर्णी तालुका कृषी अधिकारी यांच्या तक्रारीवरुन सायबर कॅफे संचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.
(२) होय, सदर प्रकरणी तालुका कृषी अधिकारी यांनी दिलेल्या लेखी फिर्याद वरून पोलिस स्टेशन आर्णी येथे गु.र.क्र.१८/२० क. ४२०, ४६७, ४६८, ४७० भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर गुन्ह्यात श्री गणेशा ऑनलाईन सायबर कॅफे आर्णीचे संचालक श्रीकांत राजेंद्र काळे रा. आर्णी यांना दिनांक १७.१.२०२० रोजी अटक करण्यात

आली असून तीन दिवस पोलिस कोठडी रिमांड घेवून विचारपुस करण्यात आली अहे. गुन्ह्याचा सखोल तपास सुरू असून तपासाअंती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगाव (जि.बुलढाणा) शहराजवळील व शेगाव रोडवरील प्लॉटची गैरप्रकारे विक्री करुन केलेला गैरव्यवहार

**(४१) * १४२८ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलढाणा) शहराजवळ व शेगाव रोडवर मोक्याच्या ठिकाणी असलेल्या व दरवर्षी सातबारा काढून न नेणाऱ्या प्लॉट धारकांच्या प्लॉटचे सन २०१५ ते २०१७ दरम्यान संगणकीय सातबारा करण्याच्या नावावर ओडीओ ऑप्शन वापरुन हस्तलिखित सातबाऱ्यावरुन अनेकांची नावे काढुन संगणक सातबाऱ्यात आपल्या मर्जीतील नावे टाकून खामगाव भाग १ चे तलाठी श्री.राजेश चोपडे यांनी त्या मालकांकडून खरेदी-विक्रीचे व्यवहार करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित अधिकाऱ्यांवर व इतर दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) श्री.राजेश चोपडे, तलाठी हे खामगाव भाग-१ या साजावर कार्यरत असतांना त्यांनी गैरप्रकार करुन हस्तलिखीत व संगणकीय गा.न.नं.७/१२ मध्ये अनधिकृत नोंदी घेतल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) होय.

तहसिलदार, खामगाव यांनी त्यांच्या दि.०३.१२.२०१९ च्या पत्रान्वये श्री.राजेश चोपडे, तलाठी यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली. त्यानंतर झालेल्या गैरप्रकार/अनियमिततेबाबत सखोल चौकशीकरिता दि.१३.१२.२०१९ च्या आदेशान्वये विशेष पथक नेमण्यात आले. सदर चौकशी पथकाने दि.०६.०१.२०२० रोजी सादर केलेल्या अंतरिम अहवालामध्ये, झालेल्या गैरप्रकार/अनियमिततेकरिता श्री.राजेश चोपडे, तलाठी हे जबाबदार असल्याचे नमूद केले आहे.

(३) तहसिलदार, खामगाव यांच्या दि.०३.१२.२०१९ च्या अहवालाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, खामगांव यांच्या दि.०५.१२.२०१९ च्या आदेशान्वये श्री.राजेश चोपडे, तलाठी यांना निलंबित करण्यात आले आहे.

तसेच वर नमूद चौकशी पथकाने दि.०६.०१.२०२० रोजी सादर केलेल्या अहवालावरुन तहसिलदार, खामगाव यांनी दि.०८.०१.२०२० रोजी श्री.राजेश चोपडे यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन खामगाव शहर येथे एफ.आय.आर. दाखल केला आहे. त्याचप्रमाणे श्री.राजेश चोपडे, तलाठी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील फिरते पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करण्याबाबत

**(४२) * ३६४१ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात पशुधनांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखाने बांधण्यात आले आहेत, यामध्ये ११ फिरते पशुवैद्यकीय दवाखाने असुन वाहन दुरूस्ती होत नसल्यामुळे पशुवैद्यकीय दवाखाने बंद केले असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फिरत्या दवाखान्यांत पशुधन विकास अधिकारी, सहायक पशुधन विकास अधिकारी, परिचर अशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असुन एकुण ३३ कर्मचाऱ्यांचे वेतन फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यात कार्यरत असल्याचे दर्शवुन काढण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यात फिरते पशुवैद्यकीय दवाखाने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत एकूण १२ फिरते पशुवैद्यकीय दवाखाने मंजुर आहेत. सदर दवाखान्यांची वाहने निर्लेखित करण्यात आली असून, सद्य:स्थितीत पशुवैद्यकीय सेवा एसटी बस / खाजगी वाहनांद्वारे प्रवास करुन पुरविली जात आहे.
(२) सदर १२ फिरते पशुवैद्यकीय दवाखान्यावर प्रत्येकी १ पशुधन विकास अधिकारी, १ सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, १ परिचर व १ वाहनचालक या प्रमाणे एकूण ४८ पदे मंजूर असून, त्यापैकी पशुधन विकास अधिकारी-६, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी-२, परिचर-२ तसेच १२ वाहन चालकांची अशी एकूण २२ पदे रिक्त आहेत.

उर्वरीत २६ अधिकारी/कर्मचारी फिरत्या पशुवैद्यकीय चिकित्सालयावर कार्यरत असून, त्यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रात सेवा पुरविली जात आहे.
(३) राज्यात फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदी/बाहयस्त्रोताद्वारे भाड्याने उपलब्ध करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सालेबर्डी (पांधी) (ता.जि.भंडारा) येथील प्रकल्पग्रस्तांना घराचा व प्लॉटचा मोबदला मिळण्याबाबत

**(४३) * २४६२ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सालेबर्डी (पांधी) (ता.जि.भंडारा) येथील प्रकल्पग्रस्तांना तातडीने घराचा व प्लॉटचा मोबदला मिळण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी दिनांक २३ जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, गोसेखुर्द पुनर्वसन विभाग यांना लेखी पत्र देऊनही ३९ प्रकल्पग्रस्तांना घराचा व प्लॉटचा मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी दिनांक १० ऑक्टोबर, २००६ रोजी पुनर्वसन सर्वे करतेवेळी अनवधानाने घरांची व प्लॉटची संयुक्त मोजणी अहवालात मोजणी झाली नसल्याने प्रकल्पग्रस्त मोबदल्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार फेरमोजणी करून प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याबाबत तसेच या प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, उल्लेखित घरे संयुक्त मोजणीच्या वेळेस अस्तित्वात नसल्याने संयुक्त मोजणी अहवालात तसेच निवाडयात समाविष्ट करण्यात आलेली नाही. उल्लेखीत प्लॉट मौजा सालेबर्डी (पांधी) गावठाणातील नसून मौजा कवडसी गावाच्या शेतीवरील आहे व गोसीखुर्द प्रकल्पाच्या पूर्ण संचय पातळीमुळे बाधित होत नाही .तसेच उल्लेखित घराचे बांधकाम कलम-४ नंतर करण्यात आले असल्याने त्यांना नियमानुसार मोबदला देणे शक्य नाही.
(३) उल्लेखित घरांची बांधकामे कलम-४ नंतर करण्यात आली असल्याने त्यांना नियमानुसार मोबदला देणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा वायगाव मोकासा (ता.जि.चंद्रपूर) येथील शेत शिवारातील पाणंद रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत

**(४४) * २७८५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा वायगाव मोकासा (ता.जि.चंद्रपूर) येथील शेत शिवारातील पाणंद रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मौजा वायगांव मोकासा येथील शेत शिवारातील पाणंद रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) मौजा वायगाव येथील पाणंद रस्त्याचे काम मगांराग्रारोहयो वार्षिक नियोजन आराखडा सन २०२०-२१ मध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील कन्हान नदी पात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(४५) * १३०८ श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील कन्हान नदी पात्रातून रात्रीच्या वेळी महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा करून वाहतूक करण्यात येत असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाचा महसूल बुडवून अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या वाळू व्यावसायिक आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या संबधित महसूल अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.
(२) व (३) नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याकरिता भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत मौदा तालुक्यात माहे एप्रिल,२०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीच्या ५४ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.६६,०७,४००/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरगा व लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यांमध्ये नवीन पशुवैद्यकीय दवाखाने कार्यान्वित करणेबाबत

**(४६) * २४०६ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा व लोहारा (जि.उस्मानाबाद) तालुक्यांमधील अनेक गावांमध्ये जनावरांची संख्या मोठ्या प्रमाणात असुन याठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाने नसल्यामुळे आजारी जनावरांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उमरगा तालुक्यातील माडज, डिग्गी, कलदेव लिंबाळा, गुंजोटी व लोहारा तालुक्यातील नागूर, हिप्परगा रवा या गावांमध्ये नवीन पशुवैद्यकीय दवाखाने कार्यान्वित करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमरगा व लोहारा तालुक्यांमधील उक्त गावांमध्ये नवीन पशुवैद्यकीय दवाखाने कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१), (२) व (३) उमरगा (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये १९ व्या पशुगणनेनुसार एकूण ६४,६०२ पशुधन घटक असून सद्या १३ पशुवैद्यकीय संस्था कार्यरत आहेत. तसेच लोहारा तालुक्यामध्ये १९ व्या पशुगणनेनुसार ३९,०४७ पशुधन घटक असून ८ पशुवैद्यकीय संस्था सद्या कार्यरत आहेत. शासनाच्या निकषानुसार पुरेशा संख्येने पशुवैद्यकीय दवाखाने उपलब्ध आहेत व त्यांचेव्दारे आजारी जनावरांना पशुवैद्यकीय सुविधा पुरविण्यात येत आहेत.

तथापि, उमरगा तालुक्यातील माडज, डिग्गी, कलदेव लिंबाळा, गुंजोटी व लोहारा तालुक्यातील नागुर व हिप्परगा रवा या भागात दवाखाना स्थापनेबाबत सन्माननीय लोकप्रतिनिधी यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

सद्या उमरगा व लोहारा तालुक्यात दवाखान्यांचा अनुशेष नसल्यामुळे पशुवैद्यकीय सुविधा पुरविण्यास कोणत्याही अडचणी नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील वाळू माफियांवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्याबाबत

**(४७) * ३०४ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.अहमदनगर) तालुक्यातील भीमा नदीच्या पात्रामध्ये दुधोडी, भांबोरा, मलठण, बाभुळगाव या परिसरात अवैध वाळू उपसा करणाऱ्या तस्करांवर पोलीस व महसूल विभागाने कारवाई करुन ११ यांत्रिक बोटी जिलेटिनच्या सहाय्याने स्फोट करुन उडवून दिल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारच्या कारवाईनंतर काही दिवसांनी वाळू माफियांच्या कारवाया पुन्हा सुरु होतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वाळू माफियांविरुध्द मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात आवश्यक ते बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.
(२) होय.
(३) वाळू माफियांविरुध्द दाखल गुन्ह्यांच्या गुणवत्तेनुसार मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते. वाळू माफियांविरुध्द मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात आवश्यक ते बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह कोकणातील कोळी वाड्यातील जमिनी मच्छीमारांच्या नावे करण्याबाबत

**(४८) * २६२३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह कोकणातील कोळी वाड्यातील जमिनी मच्छीमारांच्या नावे करण्यासाठी आणि मालकी हक्कासाठी, ७/१२, प्रॉपर्टी कार्डवर नावे दाखल करणेबाबत, अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीच्या अध्यक्षांनी मा.महसूल मंत्री महोदयांना दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास

दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तातडीने बैठक घेऊन कार्यवाही करण्याचे आश्वासन शासनाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मच्छीमार कृती समितीने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने माहे फेब्रुवारी, २०२० पर्यंत या विषयासंदर्भात मंत्रालयात बैठक घेऊन मच्छीमारांच्या जमीनी आणि घरे नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थितीत काय आहे,

(३) अद्याप, याबाबत शासनाने कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) कोकणातील मुंबईसहित कोळीवाड्यातील जमीनी मच्छीमारांच्या नावे करण्यासाठी आणि मालकी हक्कासाठी गा.न.नं. ७/१२, प्रॉपर्टी कार्डवर नावे दाखल करण्याबाबत अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीच्या अध्यक्षांचे दि.१७.१२.२०१९ चे निवेदन मा. मंत्री (महसूल) यांना प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून दि.१२.०२.२०२० च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवालाच्या आधारे मा.मंत्री (महसूल) यांचेकडे बैठक आयोजित करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून केलेली हत्या

**(४९) * ४८१ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील कारिवली सुभाष नगर येथील बाजूच्या जंगलात नेऊन एका ७ वर्षीय मुलीवर मध्यरात्रीच्या सुमारास दोन नराधमांनी सामूहिक बलात्कार करून डोक्यात दगड घालून हत्या केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, भिवंडी (जि.ठाणे) खाडीपार येथील घरात घुसून एका व्यक्तीने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली असून या प्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० राजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुभाष नगर येथील प्रकरणाचा जलदगती न्यायलयात खटला चालविण्यात यावा व मुलीच्या नातेवाईकांना मनोधैर्य योजनेतून अर्थसहाय्य देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सदरहू मुलींच्या कुटुंबियांना सहाय्य देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय. तथापि, सामुहिक बलात्कार नाही.

(२) होय.

(३) अशा स्वरूपाचे निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेखातील नोंदीवरून दिसून येत नाही.

(४) **घटना क्र. १:-** फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून भोईवाडा पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गु.र.नं. ४०१/२०१९ भादवि कलम ३६४, ३७६, ३७६ (एबी), ३७६ (डीबी), ३०२ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ८, ९ (ह), १०, १२ अन्वये आरोपीविरूध्द गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीताला अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे. मा.न्यायालयात आरोपीविरूध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले मा. न्यायालयामध्ये सदर केसेची सुनावणी फास्ट ट्रॅक वर चालु झालेली आहे. तसेच पिडीत मयत बालिका हीचे नातेवाईकांना मनोधैर्य योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळणेबाबत सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**घटना क्र. २ :-** फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून निजामपुरा पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गु.र.नं. ३४७/२०१९ भादवि कलम ३७६ अ,ब, ४५२ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ५ (एम), ६ अन्वये आरोपीविरूध्द गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीताला अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हयाचा पोलीस तपास चालू आहे. तसेच पिडीत मुलीस मनोधैर्य योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळणेबाबत सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयातील तरुणीवर शारीरिक अत्याचार करुन केलेला खून

**(५०) * ३९७३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील मोतीबाग परिसरातील उड्डाणपूलाजवळील रेल्वे रुळावर संशयास्पदरित्या मृतदेह आढळून आलेल्या दीपाली रमेश शेंडगे (वय:२२ रा.सिरसवाडी रोड, म्हाडा कॉलनी) या तरुणीचा शारीरिक अत्याचारानंतर खून झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलीवर शारीरिक अत्याचारानंतर आरोपीने तिचा खून केल्याची पडताळणी न करताच या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मुलीच्या वडिलांच्या फिर्यादी नंतर सदर खून प्रकरणी आरोपीसह त्याच्या इतर साथीदारांविरुद्ध बलात्काराचा गुन्हा न नोंदवता मात्र खून, पुरावा नष्ट करणे व अट्रोसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मुलीचा बलात्कार व खून प्रकरणी शासनाने आरोपीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच निर्भया निधीतून या मुलीच्या कुटुंबियांना कोणती मदत केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) दिनांक २१/१२/२०१९ रोजी रेल्वे रूळावर तरूणीचा संशयास्पद मृतदेह आढळून आल्याने पोलीस ठाणे चंदनझिरा, जिल्हा जालना येथे कलम ३०२, २०१, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणामध्ये सुरवातीला मृत्यूचे निश्चित कारण माहीत नसल्यामुळे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. तथापि वैद्यकीय अधिकारी यांनी पी.एम. रिपोर्ट अहवालामध्ये मयत मुलीच्या डोक्याला जखम होऊन अंतर्गत रक्तस्त्रावामुळे मृत्यू झाल्याबाबत अभिप्राय दिल्यानंतर, दिनांक २२/१२/२०१९ रोजी मयत मुलीच्या वडिलांच्या फिर्यादीवरून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) मयत मुलीवर शारीरिक अत्याचार झाल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झालेले नाही. तसेच मयत तरूणीवर अगोदर शारीरिक अत्याचार झाले आहेत किंवा कसे यांची तपासणी करण्याकरिता नमूने पडताळणी करीता न्यायसहायक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे पाठविण्यात आले असून सी.ए. अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर गुन्ह्यात अद्याप बलात्काराचे कलम लावण्यात आलेले नाही.

(४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे चंदनझिरा, जिल्हा जालना येथे गु.र.नं. ३७५/२०१९ कलम ३०२, २०१, ३४ भा.दं.वि. प्रमाणे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीताला अटक करण्यात आले असून सध्या आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे. तसेच मयत मुलीवर बलात्कार झाले बाबत आतापर्यंत केलेल्या तपासात निष्पन्न न झाल्याने निर्भया निधीतून मयत मुलीच्या कुटुंबियांना मदत मिळणेबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परांडा (जि.उस्मानाबाद) येथील तहसिलदारांवर वाळू माफियांनी केलेला हल्ला

**(५१) * ७८१ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) येथील तहसिलदारांवर वाळूमाफियांनी प्राणघातक हल्ला करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केल्यामुळे या घटनेचा महाराष्ट्र राज्य, तहसिलदार व नायब तहसिलदार संघटनेने तीव्र निषेध नोंदवून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तीव्र आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांतही माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच अशा घटना घडू नयेत व यावर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) तहसिलदार, परांडा यांचेवर वाळू माफियांनी केलेल्या प्राणघातक हल्ल्याचे निषेधार्थ महाराष्ट्र राज्य तहसिलदार व नायब तहसिलदार संघटनेने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, लातूर व सोलापूर यांना निवेदन देवून जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद व लातूर यांचे कार्यालयासमोर आंदोलन केले होते.

तहसिलदार, परांडा (जि.उस्मानाबाद) यांचे अंगावर ट्रॅक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी परांडा पोलीस ठाणे येथे दि.१४/१२/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी राज्यात जिल्हानिहाय व तालुकानिहाय भरारी पथके स्थापन केली असून भरारी पथकाद्वारे गौण खनिज उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर भरारी पथकांना गरजेनुसार पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येत आहे.

-----------------

## मौजे पेढे व परशुराम (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांना भुसंपादनाचा मोबदला देण्याबाबत

**(५२) * ४७२५ श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पेढे व परशुराम (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने विविध प्रकल्पांसाठी संपादित केल्या असून गावांतील शेतकरी पिढयांपिढया या जमिनीची मशागत करीत असताना तसेच कुळकायदा शासनाने संपुष्टात आणलेला असतांना सन १९७२ मध्ये शेतकऱ्यांच्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर देवस्थानचे नाव लावण्यात आले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनी शेतकऱ्यांच्या नावांवर करण्यात याव्यात व ७/१२ च्या उताऱ्यावर त्यांची नावे लावावीत यासाठी पेढे व परशुरामच्या ग्रामस्थांनी अनेकदा आंदोलने व उपोषण करुन तशी मागणी शासनाकडे अनेक वर्षापासून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनस्तरावर तत्कालीन मा.महसूल मंत्री यांच्या उपस्थितीत बैठका होऊन त्यामध्ये संबंधित देवस्थान व खोतांना प्रत्येकी १० टक्के व शेतकरी कुळांना ८० टक्के मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, मात्र त्याबाबतचे आदेश अद्याप निर्गमित करण्यात आले नसून शासनाने त्याबाबत शासन आदेश निर्गमित करावेत म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) मौजे परशुराम व पेढे या गावातील सर्व जमिनी देवस्थान इनाम असून सदर जमिनीच्या मालकी हक्काबाबत परशुराम देवस्थान ट्रस्ट, जमिनीचे वहिवाटदार व इतर हक्कात जमिनीतील कुळे अशा नोंदी आहेत. सदर गावास सन १९५८ मध्ये रेकॉर्ड ऑफ राईट लागू करण्यात आलेले आहेत. या गावामध्ये सन १९५८ मध्ये रेकॉर्ड ऑफ राईटच्या वेळी कुळांची नावे अभिलेखात दाखल झाली असली तरी कुळ कायद्याच्या कलम ३२ ग खाली विक्री तसेच कलम "३२ म" प्रमाणपत्र निर्गमित झालेली नाहीत. श्रीदेव भार्गवराम देवस्थानचे नाव दि.१४/२/१९७२ रोजी फेरफार क्रमांक १२०९ अन्वये करण्यात आले असून, तत्पूर्वीच कुळांची नावे दाखल करण्यात आली असल्याने ती कमी करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मौजे परशुराम व पेढे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या चौपदरीकरणासाठी संपादीत होणा-या जमिनींचे गाव नमुना नं. ७/१२ उता-यावर देवस्थान, वहिवाटदार व कुळे अशी नावे दाखल असल्यामुळे येथील शेतकऱ्यांनी १०० टक्के जमीनींचा मोबदला मिळण्याबाबत मागणी केलेली आहे. तसेच, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि.२७.१२.२०१९ रोजीचे निवेदनदेखील प्राप्त झालेले आहे.

याप्रकरणी भूसंपादन मोबदल्याच्या मागणीच्या अनुषंगाने, तत्कालीन मंत्री (महसूल) यांच्याकडे दि.३.६.२०१९ रोजी आयोजित संयुक्त बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :-

"देवस्थान जमिनींच्या मूल्यांकनाबाबत देवस्थान व कुळे यांना किती प्रमाणात नूकसान भरपाई रक्कम अदा करण्यात यावी याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीईव्ही-३५०५/३३०/प्रक्र.४७/ल-४ दिनांक २६/६/२००६ अन्वये भूसंपादनाच्या मोबदला रक्कमेतील ५० टक्के एवढी रक्कम देवस्थानास व ५० टक्के एवढी रक्कम कुळास देण्यात यावीत असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तरीही, पेढे परशुराम देवस्थान समितीचे विश्वस्त आणि ग्रामस्थ परस्पर सामंजस्याने सदर रकमेची विभागणी करण्यास तयार असून, देवस्थान विश्वस्त समिती त्यांच्या ५० टक्के मोबदल्याच्या रकमेतून ४० टक्के रक्कम (देवस्थान विश्वस्त समितीला प्राप्त होणाऱ्या रकमेच्या ८०

टक्के) संबंधित वहिवाटदार / कुळास समर्पित करण्यास तयार असून त्याबाबत देवस्थान विश्वस्त समिती मा.जिल्हा न्यायाधिश तथा अध्यक्ष, पेढे परशुराम देवस्थान यांना लेखी कळविण्यास तयार आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जिल्हा न्यायाधिश यांच्याशी सदर विषयाबाबत सकारात्मक चर्चा करावी."

त्यानंतर, वरीलप्रमाणे प्रस्तावित बाबींचा सकारात्मक प्रस्ताव मा.जिल्हा न्यायाधिश तथा अध्यक्ष, पेढे परशुराम देवस्थान यांना पाठवून त्यांच्याकडून मंजूरी प्राप्त करुन घेवून १० टक्के रक्कम देवस्थानास देण्यास व उर्वरित रक्कम कुळ व वहिवाटदारांना देण्यास हरकत नाही असे पत्र प्राप्त करुन घेण्यास जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी देवस्थान समितीस दि.९.९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शंकरनगर (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील साईबाबा विद्यालयातील अल्पवयीन मुलीवर झालेला लैंगिक अत्याचार

**(५३) * ३४८८ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शंकरनगर (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील साईबाबा विद्यालयातील सातवीच्या वर्गात शिकत असलेल्या एका अल्पवयीन मुलीवर ४ शिक्षकांनी लैंगिक अत्याचार केल्याबाबतची तक्रार रामतीर्थ पोलीस स्थानकात दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील ४ शिक्षक व १ महिला यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात येऊन २ दिवसाचा कालावधी झाल्यानंतरही आरोपींना अटक करण्यात न आल्यामुळे शाळेच्या प्रवेशव्दाराजवळ विद्यार्थ्यांच्या व पिडीत मुलीच्या पालकांनी आंदोलन सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरोपींना पोलीसांनी अटक न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच कारवाईची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

दि. १८ जानेवारी, २०२० रोजी पिडीत मुलीच्या आईने तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, पिडीत मुलीवर दोन शिक्षकांनी लैगिंक अत्याचार केल्याचे आढळून आले व इतर तीन जणांनी सदर घटना दडपण्याचा प्रयत्न केल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेचा निषेध म्हणून गुन्ह्याचे घटनास्थळ असलेली शाळा बंद ठेवण्यात आली होती.

(३) व (४) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस स्टेशन रामतिर्थ जिल्हा नांदेड येथे गु.र.क्र. १३/२०२० कलम ३७६ (ड), ३७६(एन), ३७६(३), ५०६, ३४ भा.द.वि. सह कलम ४, ६, १०, १२ बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण अधिनियम २०१२ व कलम ३(१)(w), ३(१) (va) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारांस प्रतिबंध) अधिनियम सुधारणा २०१५ अन्वये आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला असून, सध्या ५ ही आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. विद्यालयाच्या प्रशासनाकडून दोषी दोन्ही शिक्षक, प्राचार्य व मुख्याध्यापक यांना निलंबित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोईसर येथील खासगी वित्तीय संस्था व बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांची केलेली फसवणूक

**(५४) * ८०४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर येथील खासगी वित्तीय संस्था व बांधकाम व्यावसायिकांनी पंतप्रधान आवास योजनेच्या नावाखाली तब्बल ४५०० ग्राहकांना फसवून ४२ कोटी रुपयांच्या सबसीडीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी संतप्त घर मालकांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास बोईसर एमआयडीसी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढून गुन्हा नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) अशंत: खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यावर ५-६ इसम तक्रारी अर्ज घेवून आले आहेत. सदर प्रकरणाबाबत बोईसर पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आलेला नाही. प्राप्त अर्जांची चौकशी सुरु असून अद्यापपर्यंत गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलीस स्थानकांत व पोलीस चौक्यांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष नसल्याबाबत

**(५५) * ४७३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निम्म्यापेक्षा अधिक पोलीस स्थानक व पोलीस चौकीमध्ये महिलांसाठी स्वतंत्र विश्रांती कक्ष व विश्रामगृह नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंदोबस्ताच्या ठिकाणीही पोलीस महिलांना स्वच्छतागृह नसल्याने आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस महिलांना ज्या ठिकाणी बंदोबस्ताकरिता पाठविण्यात येते त्या ठिकाणी स्वच्छतागृह किंवा तात्पुरत्या (फिरत्या) स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्याचे कायमस्वरूपी नियोजन शासन करणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचा-यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व विश्रामगृह उपलब्ध आहेत. तसेच राज्यात (बृहन्मुंबई वगळता) एकूण १०२१ पोलीस ठाण्यांपैकी ८३८ पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचा-यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व ५९० पोलीस ठाण्यांमध्ये स्वतंत्र विश्रामगृह उपलब्ध आहेत. उर्वरीत पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व विश्रामगृह प्रस्तावित आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.बंदोबस्ताच्या ठिकाणी शासकीय/निमशासकीय कार्यालयीन इमारतीतील स्वच्छतागृहे महिला पोलिसांना वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, ज्या वेळी बंदोबस्त रस्त्यांवर किंवा ज्या ठिकाणी कोणतेही स्वच्छतागृह उपलब्ध नसते अशा ठिकाणी असतो त्या वेळी महिला पोलीसांसाठी तात्पुरत्या (फिरत्या) स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुतगिरण्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी धोरण आखण्याबाबत

**(५६) * ३१४७ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुताच्या दरामध्ये प्रंचड भाव वाढल्यामुळे सुतावर प्रक्रिया करणारे सायझिंग कारखाने, यंत्रमाग कारखाने व त्यावर आधारीत सर्वच इतर लहान-मोठे व्यवसाय बंद पडल्यामुळे वस्त्रोद्योग अडचणीत सापडला असुन त्यावर अवलंबून असणाऱ्या कारखान्यांतील कामगार बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने भांडवल दिलेल्या १३० सूत गिरण्यांपैकी २९ सूत गिरण्यांची आर्थिक स्थिती चांगली नसून ७ सुत गिरण्या बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या राज्यातील सुत गिरण्यांची दुरवस्था होण्या मागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, वस्त्रोद्योगाची झालेली दुरावस्था लक्षात घेवुन राज्यातील सुतगिरण्यांसाठी धोरण आखून सुतगिरण्या सुस्थितीत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२) राज्य शासनाने १४० सहकारी सूतगिरण्या अर्थसहाय्याकरिता घेतलेल्या असून १३६ सहकारी सूतगिरण्यांना रु.१९५३१५.३६ लाख इतके शासकीय भागभांडवल उपलब्ध करुन दिलेले आहे.

सदर १४० सहकारी सूतगिरण्यापैकी,

उत्पादनाखाली - ६९

उभारणीखाली - २७

बंद - ०७

अवसायन - २९

नोंदणी रद्द - ०७

रुपांतरीत - ०१

सूतगिरण्या आहेत.

(३) अवसायनात असलेल्या २९ सहकारी सूतगिरण्यानी मंजूर प्रकल्प अहवालाप्रमाणे प्रकल्पाची पूर्ण क्षमतेने उभारणी केली नसल्याने सूतगिरण्यांचा प्रकल्प पूर्ण होवू शकला नाही. यामुळे सूतगिरण्या आर्थिक अडचणीत आल्यात.

७ सहकारी सूतगिरण्या बंद आहेत.

बंद असलेल्या सहकारी सूतगिरण्या या खालील कारणामुळे बंद असल्याचे दिसून येते.

१. सूतगिरण्यांनी प्रकल्प अहवालानुसार स्वभागभांडवलाची उभारणी केलेली नसणे.

२. सूतगिरण्यांनी प्रकल्प अहवालानुसार दीर्घ मुदती कर्जाची पूर्णपणे उभारणी न करणे.

३. प्रकल्पाची पूर्ण क्षमतेने उभारणी न होणे.

४. सूतगिरणीकडून मंजूर प्रकल्प अहवालातील तरतूदीपेक्षा जास्त खर्च करण्यात येणे

५. सूतगिरण्यांनी वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड न केल्याने व्याजाचा भुर्दंड बसणे.

(४) राज्यातील सूतगिरण्या सुस्थितीत सुरु राहण्यासाठी सहकारी सूतगिरण्यांसाठी खालील प्रमाणे योजना आहेत.

१. शासन निर्णय दि.११.०८.१९९३ व दि.२४.०३.१९९९ अन्वये, शासकीय भागभांडवल योजना सुरु करण्यात आली आहे.

२. शासन निर्णय दि.१७.११.२००० अन्वये रा.स.वि.नि. अंतर्गत आधुनिकीकरण / विस्तारीकरण योजना सुरु करण्यात आली आहे.

३. शासन निर्णय दि.२६.०३.१९८७ अन्वये, पुर्नवसन कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे.

४. शासन निर्णय दि.०३.१२.२०११ अन्वये, उत्पादनाखालील सूतगिरण्यांना प्रति किलो रु.२०/- प्रमाणे बिनव्याजी कर्ज देण्यात आले आहे.

५. शासन निर्णय दि.११.०१.२०१७ अन्वये, सहकारी सूतगिरण्यांना प्रतिचाती रु.३०००/- प्रमाणे वित्तीय संस्थेकडून/रा.स.वि.नि. कडून त्यांचे स्तरावर ५ वर्ष मुदतीसाठी कर्ज घ्यावे. सदर ५ वर्षाचे कमाल १२% पर्यंतचे व्याज शासन भरेल अशी योजना सुरु करण्यात आली आहे.

६. शासन निर्णय दि.२१.१२.२०१८ अन्वये, सहकारी सूतगिरण्यांना रु.३.००/- प्रतियुनिट प्रमाणे वीज बिलात सवलत जाहिर करण्यात आली आहे.

७. नवीन वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ अंतर्गत सहकारी सूतगिरण्यांना २५ टक्के भांडवली अनुदान व विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील प्रकल्पासाठी १० टक्के अतिरिक्त भाडवली अनुदान योजना सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाने औषधी वनस्पती लागवडीसाठी दिलेल्या निधीबाबत

**(५७) * २९९५ श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जंगले तोडून तेथे शेती करण्याचे प्रमाण वाढत असुन जंगले व जंगलासोबतच तेथील वनौषधी वनस्पती नष्ट होण्याचे प्रमाण वाढल्यामुळे केंद्र शासनाने मागील वर्षापासून ३४ जिल्हयांत औषधी वनस्पती लागवडीसाठी निधी उपलब्ध करुन दिला असुन ४८० हेक्टर वनौषधींच्या लागवडीसाठी २७७ लाख १५ हजार रुपये दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन २०१९-२०२० मध्ये राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत औषधी वनस्पती लागवडीला मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासन ६० टक्के व राज्यशासन ४० टक्के रक्कम खर्च करणार असून याबाबत शासकीय संस्था, कृषी विद्यापीठ, वन विभागास यासाठीचे आराखडे तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बुलढाणा, अकोला व अमरावती जिल्हयात वनौषधीचे लागवड मोठया प्रमाणावर होत असल्याने या जिल्हयांसोबतच राज्यातील इतर जिल्हयांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय.

(२) होय. रुपये ४०९.१०६ लाख एवढा निधी मंजूरीचे आदेश आयुष मंत्रालयाकडून (राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ) संचालक (आयुर्वेद) यांना निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) होय. वार्षिक आराखडा तयार करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(४) होय.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात तूर पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळयांचा झालेला प्रादुर्भाव

**(५८) * १४३७ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात तूर पिकावर शेंगा पोखरणा-या अळयांचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयातील ६२ हजार हेक्टरवरील शेतकऱ्यांच्या तूर पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासह सदरहू रोगाला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

माहे डिसेंबर, २०१९ मध्ये किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पातील निरीक्षणानुसार बुलढाणा जिल्हयात ७ गावांमध्ये तूर पिकांवर शेंगा पोखरणाऱ्या अळयांची संख्या आर्थिक नुकसानीच्या पातळीच्या वर गेली होती. तथापि, सदर प्रादुर्भावाची तीव्रता २-३ टक्के होती. प्रादुर्भाव दिसताच सदरील गावांमध्ये शास्त्रज्ञांसमवेत अधिकारी व कर्मचारी यांनी ३ वेळा क्षेत्रिय स्तरावर बैठका आयोजित करून शेतकऱ्यांना वेळेत मार्गदर्शन केले. तसेच खबरदारीची उपाययोजना म्हणून किड व रोग नियंत्रणासाठी ५० टक्के अनुदानावर डायमिथाईट १९८४ लिटर, इमामेक्टिन बेन्झोएट १९४६.८० किलो व अॅझेडीरेकटीन १९८४ लिटर औषधांचे वाटप करण्यात आलेले आहे.

जिल्हयातील शेतकऱ्यांना तूर पिकासाठी पीक पेरणी ते काढणीपर्यंत एसएमएस, वर्तमाणपत्रे, भिंतीपत्रके, शेतकरी मेळावे, शेतकऱ्यांच्या बैठका, शेतीशाळा, इ. माध्यमातून प्रचार प्रसिध्दी व मार्गदर्शन करण्यात आले आहे. सदर सर्व बाबींचा अवलंब केल्यामुळे तूरीवरील शेंगा पोखरणारी अळी ही नियंत्रणात आल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांच्या चुकीच्या मुल्यांकनामुळे शासनाच्या महसुलाचे झालेले नुकसान

**(५९) * ४७६८ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांनी अधिनिर्णय प्रकरण क्र.२४०८२०१४ या एकाच प्रकरणात चुकीचे मुल्यांकन करुन शासनाचा ६७.७५ कोटी रुपयांचा महसूल बुडविल्याचे महानिरिक्षक यांचे मुल्यांकन ५३ अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ वा त्यासुमारास पत्रान्वये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांनी १५ प्रकरणात ४.१५ कोटी रुपयांचा, सहाय्यक नगर रचनाकार मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी ५८ प्रकरणात ८७.९७ कोटी रुपयांचा तसेच मुंबई विभागातील इतर मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल चुकीचे मुल्यांकन केल्यामुळे बुडाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाचा महसूल बुडविण्यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) महालेखाकार कार्यालयाच्या तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत लेखातपासणी पथकामार्फत मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांचे कार्यालयाची तपासणी केली असता, उक्त तपासणीमध्ये उक्त कार्यालयाच्या अभिनिर्णय प्रकरण क्र.१४०२/२०१४ मध्ये रु.६७,७४,९५,६००/- इतक्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार, उक्त प्रकरणाचे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५३अ खाली मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पुनरीक्षण (Revision) करण्यात आले असता, उक्त प्रकरणामध्ये रु.४९,३१,१४,१५१/- इतक्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी केली असल्याचे अंतिमत: निदर्शनास आले आहे.
(२) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत लेखातपासणी पथकामार्फत मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांचे कार्यालयाची तपासणी केली असता, उक्त तपासणीमध्ये उक्त कार्यालयातील एकुण ५८ प्रकरणांमध्ये रु.८७,९७,३८,७१३/- इतक्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी केली असल्याची बाब मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निदर्शनास आली आहे.
(३) व (४) एखाद्या प्रकरणी उपस्थित तक्रार तथा आक्षेपाच्या अनुषंगाने चुकविलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम निर्धारित करुन उक्त रक्कम वसूल

करण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीनुसार पार पाडली जाते.

त्यानुसार, उक्त सर्व प्रकरणांची मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५३ अ च्या तरतूदीखाली पुनरीक्षणाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. मुद्रांक शुल्क निर्धारीत करण्याची कार्यवाही ही अर्ध-न्यायिक (Quasi-Judicial) स्वरुपाची आहे.

उक्त पुनरीक्षणाच्या कार्यवाही अंती मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांचे मार्फत आदेश निर्गमित झाल्यानंतर उक्त अभिनिर्णीत प्रकरणांशी संबंधित असलेले नोंदणी व मुद्रांक विभागातील क्षेत्रिय अधिकारी तथा कर्मचारी यांनी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या प्रचलित तरतूदी/नियम तसेच मुल्यांकनाच्या मार्गदर्शक सुचनांकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन सदर प्रकरणी जाणीवपूर्वक चुकीची मुद्रांक शुल्क आकारणी करुन शासनाचे मुद्रांक शुल्करुपी महसूलाचे नुकसान केले असल्याची बाब विभागाच्या निदर्शनास आल्यास निश्चितच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) आणि (शिस्त व अपील) नियमांच्या तरतूदीनुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

-----------------

## कोलशेत, ठाणे परिसरातील दिप पॅरामेडिकल ऑर्गनायझेशन या संस्थेच्या अध्यक्षांनी विद्यार्थ्यांची केलेली फसवणूक

**(६०) * २६२९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलशेत, ठाणे परिसरातील दिप पॅरामेडिकल ऑर्गनायझेशन या संस्थेच्या अध्यक्षांनी राजस्थानमधील ओपीजीएस आणि अन्य विद्यापीठाच्या नावाने औषधनिर्माण शास्त्राचे बनावट प्रमाणपत्र देऊन ७२४ विद्यार्थ्यांची फसवणूक करुन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे ठाणे गुन्हे अन्वेषण शाखा युनिट-१ च्या पोलिस पथकाने केलेल्या तपासात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र, उत्तरप्रदेश आणि दिल्लीमधील विविध संस्थांकडून दहावी आणि बारावी परीक्षांमध्ये उत्तीर्ण झाल्याचे बनावट प्रमाणपत्र मिळवून देण्यात आल्याचे तपासातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी कापुरवाडी पोलीस ठाणे येथे १) गु.र.क्र. १४/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण १७ आरोपी यांना अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपीत यांचेविरोधात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तद्नंतर फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कापुरवाडी पोलीस ठाणे येथे २) गु.र.क्र. १५१/२०१९ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गून्ह्यात एकूण ३ आरोपी निष्पन्न झाले असून यातील मुख्य आरोपीचा मा. उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामिन मंजूर केला असून इतर दोन आरोपीत यांचा शोध सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील सहायक मत्स्य व्यवसाय आयुक्त व परवाना अधिकारी यांनी लाच घेतल्याबाबत

**(६१) * ५१९ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील समुद्रामध्ये पर्ससीनद्वारे बेकायदेशीर मच्छिमारी करणा-या ट्रॉलर्सवर कारवाई न करण्यासाठी मालवणच्या स्थानिक मत्स्य व्यवसायीकाकडे सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त व परवाना अधिकारी यांनी ५ लाख रुपयांची लाच मागितली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मत्स्य व्यवसायिकांच्या तक्रारीवरुन सिंधुदुर्गच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त व परवाना अधिकारी यांना लाचेचा पहिला हप्ता रुपये २ लाख स्विकारतांना दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास रंगेहाथ पकडले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने लाच घेणाऱ्या सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त व परवाना अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२), खरे आहे.
(३), आलोसे १) श्री. शिवराज अनंत चव्हाण, परवाना अधिकारी व आलोसे २) प्रदिप लक्ष्मण वस्त, प्रशिक्षण अधिकारी, मत्स्यव्यवसाय विभाग, मालवण यांना दिनांक १३.०१.२०२० च्या शासन आदेशान्वये दिनांक ०५.०१.२०२० रोजी अटकेच्या दिनांकापासून निलंबित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील कृषी सहाय्यकांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत कामावर टाकलेला बहिष्कार

**(६२) * ५०३८ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) ६५ हजार ९३२ शेतक-यांनी अर्ज सादर केले असुन त्यापैकी ९ हजार ८७८ अर्जांना ग्राम कृषी संजीवनी समितीने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी सहाय्यकांनी पोकराच्या कामावर बहिष्कार घातल्याने जिल्ह्यातील तब्बल ७ हजार ८५७ प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी सहाय्यक यांनी पोकरच्या कामावर बहिष्कार टाकण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकाली काढून शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

परभणी जिल्ह्यातून दिनांक ११.२.२०२० रोजी ७९,०९७ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावरुन ४१,३३० अर्जांना मंजूरी दिली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) कृषि सहाय्यकांच्या संघटनेने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त (कृषि) यांनी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि सहाय्यक संघटना यांचे समवेत झालेल्या चर्चेत सर्व कृषि सहाय्यकांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचे कामकाज नियमितपणे करण्याबाबत चर्चा केली. चर्चा झाल्यानंतर संघटनेने बहिष्कार मागे घेतला. आयुक्त (कृषि) यांनी प्रकल्पातील कामाची इतर अधिकारी/कर्मचारी यांचेकडे विभागणी केली असून सदर प्रकल्पांतर्गत प्राप्त होणारे शेतकऱ्यांचे प्रस्ताव निकाली काढण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रात विशेष जनसुरक्षा कायदा लागू करण्याबाबत

**(६३) * ४७४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली व तत्सम भागातील नक्षलवाद पूर्णपणे बिमोड करण्याकरिता छत्तीसगड राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात सुद्धा विशेष जनसुरक्षा कायदा (स्पेशल पब्लिक सेक्युरिटी अक्ट) लागू करण्याची आवश्यकता असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गडचिरोली जिल्ह्यातील संवेदनशील भागातील विकास कामे पूर्ण करण्याकरिता केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात सुद्धा विशेष सुरक्षा पथक उभारण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) हे खरे नाही. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी जुलै, २०१७ मध्ये छत्तीसगड राज्यात ज्याप्रमाणे जनसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी होत आहे, त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात जनसुरक्षा कायद्यास मान्यता मिळण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. तथापि, सद्य:स्थितीत नक्षलवादी व त्यांचे समर्थक यांचेविरुध्द कारवाई करण्यासाठी UAP ॲक्ट (Unlawful Activities Prevention Act) हा प्रभावी व उपयुक्त कायदा अस्तित्त्वात आहे. त्यामुळे छत्तीसगड राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात विशेष जनसुरक्षा कायदा (Special Public Security Act) लागु करण्याची सध्यातरी आवश्यकता वाटत नाही.

(२) व (३) गडचिरोली जिल्ह्यातील संवेदनशील भागातील विकासकामे पूर्ण करण्यासाठी विकासकामांना राज्य सरकारद्वारे गडचिरोली जिल्हा पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल तसेच केंद्रीय सुरक्षा बल यातील तैनात अधिकारी कर्मचाऱ्यांमार्फत संरक्षण देण्यात येते. त्यामुळे केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यातसुध्दा विशेष सुरक्षा पथक उभारण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात दर्जेदार क्रिडापटू तयार करण्यासाठी धोरण आखण्याबाबत

**(६४) * ३६४५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद आणि अमरावती येथे क्रीडा संकुले उभारण्यात आली असुन योग्य देखभाल होत नसल्यामुळे क्रीडा संकुल वापराविनाच पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, होतकरु खेळांडूना आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यास क्रीडापटू तयार करण्यासाठी केंद्र सरकारकडून आलेला निधीही वापराविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार राज्यातून दर्जेदार क्रिडापटू तयार करण्यासाठी धोरण आखण्यासह प्राप्त निधीचा योग्य वापर करुन क्रिडा संकुलांची देखभाल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) व (४) निधीच्या वापराबाबत व क्रीडा संकुलांच्या देखभालीबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.